दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
रविवार पुरवणी २८ जुलै २०२४

## कोकणातील पाऊस आणि सरकारची विलंबित मदत

संपादकीय

कोकण हा परिसर आपल्या सुंदर निसर्गरम्य दृश्यांसाठी आणि शांत समुद्रकिनाऱ्यांसाठी ओळखला जातो. परंतु या वर्षीचा पावसाळा या परिसरासाठी अत्यंत विनाशकारी ठरला आहे. मुसळधार पावसाने पुर आणि भूस्खलन घडवून आणले आहेत. संपूर्ण गावे पाण्याखाली गेली आहेत, घरांचे नुकसान झाले आहे, आणि अनेक लोकांचे जीवन उद्ध्वस्त झाले आहे. स्थानिक समुदायांनी आपत्तीशी सामना करण्यासाठी भरपूर प्रयत्न केले आहेत, परंतु विनाशाचा प्रमाण इतका मोठा आहे की ते प्रयत्न पुरेसे ठरत नाहीत.



कोकण क्षेत्र हळूहळू पुनर्रचना करण्यास सुरुवात करत आहे, तरीही लक्ष आता पुनर्निर्माण आणि भविष्यासाठी तयारीवर असावे. सरकार आणि नागरी समाजाने एकत्र काम करून, पुरांच्या संरक्षणासाठी आणि प्रारंभिक चेतावणी प्रणालींसारख्या संरचना निर्माण कराव्यात. स्थानिक क्षमतावृद्धीमध्ये गुंतवणूक करून, समुदायांना नैसर्गिक आपत्तींना अधिक प्रभावीपणे प्रतिसाद देण्यास सक्षम केले जाऊ शकते.

आपत्ती व्यवस्थापन हे सरकारचे एक महत्त्वाचे कार्य आहे, आणि या घटनेने सरकारच्या व्यवस्थापनाच्या क्षमतांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

कोकणातील पाऊस आणि त्याने निर्माण केलेली आपत्ती ही एक नैसर्गिक आपत्ती आहे, जी हवामान बदलांच्या परिणामांचे एक स्पष्ट उदाहरण आहे. या घटनेच्या परिणामांचे आकलन करून, सरकारने आणि नागरी समाजाने एकत्रितपणे काम करून भविष्यातील आपत्तींच्या परिणामांना कमी करण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात.

या संकटाच्या पार्श्वभूमीवर, सरकारी अधिकाऱ्यांची प्रतिसाद देण्याची क्षमता अत्यंत मंद आहे. पावसाच्या तात्काळ परिणामांमुळे हजारो कुटुंबांना अन्न, स्वच्छ पाणी आणि निवारा न मिळाल्यामुळे खूप त्रास सहन करावा लागला आहे. वेळेवर मदत न मिळाल्यामुळे अनेक लोकांनी काही दिवस अत्यंत कठीण परिस्थितीत घालवले आहेत.

या विलंबित प्रतिसादाचे कारण प्रशासकीय अनियमितता आणि तांत्रिक आव्हाने आहेत, परंतु अशा संकटाच्या वेळी ही कारणे योग्य नाहीत. सरकारची आपत्ती व्यवस्थापन प्रणाली यंदाच्या पावसाच्या तीव्रतेसाठी तयार नव्हती. सर्वाधिक प्रभावित भागांपर्यंत मदत पोहोचण्यास विलंब होणे आणि मदत साहित्य वितरणात असलेल्या अडचणींच्या नोंदी होणे हे वारंवार घडले आहे.

सरकारी मदतीच्या अभावातही स्थानिक समुदायांनी दाखवलेले धैर्य आणि एकता खूप प्रेरणादायी आहे. शेजारील गावांनी एकत्र येऊन एकमेकांना मदत केली आहे, ज्यात लोकांनी त्यांच्या थोड्या फार साधनांचा वापर केला आहे. एनजीओ आणि खाजगी संघटनांनी या अंतराला भरून काढण्यासाठी प्रयत्न केले आहेत, परंतु त्यांचे प्रयत्न या आपत्तीच्या प्रमाणात पुरेसे नाहीत.

या आपत्तीने आपत्ती व्यवस्थापनातील तात्काळ बदलांची गरज अधोरेखित केली आहे. सरकारने आपत्कालीन प्रतिसाद धोरणांचे पुनरावलोकन करून ते सुनिश्चित करावे की मदत त्वरित, प्रभावी आणि गरजूंपर्यंत विनाविलंब पोहोचेल. पावसाळ्यापूर्वीची योजना, विविध सरकारी एजन्सींमधील उत्तम समन्वय आणि मजबूत संवाद प्रणालीची स्थापना या तात्काळ पावलांची आवश्यकता आहे.

आपत्तीच्या वेळी सरकारने अधिक तत्परता दाखवून प्रभावित लोकांपर्यंत मदत पोहोचवण्याची गरज आहे. प्रशासकीय अनियमितता आणि तांत्रिक अडचणींवर मात करून, आपत्ती व्यवस्थापन प्रणालीला सुधारण्याची आवश्यकता आहे.नागरी समाजाने आपत्तीच्या वेळी एकत्र येऊन एकमेकांना मदत करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्थानिक समुदायांनी दाखवलेली एकता आणि धैर्य हे प्रेरणादायी आहे, परंतु त्यांना सरकारच्या मदतीची आवश्यकता आहे. एनजीओ आणि खाजगी संघटनांनी मदतीचा हात दिला आहे, परंतु त्यांचे प्रयत्न आपत्तीच्या प्रमाणात पुरेसे नाहीत.

आपत्ती व्यवस्थापन प्रणालीमध्ये सुधारणा करून, भविष्यातील आपत्तींच्या परिणामांना कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. पुर संरक्षणासाठी संरचना निर्माण करणे, प्रारंभिक चेतावणी प्रणालीची स्थापना करणे आणि स्थानिक क्षमतावृद्धीमध्ये गुंतवणूक करणे या तात्काळ पावलांची आवश्यकता आहे.

कोकणातील पाऊस आपत्ती ही एक गंभीर घटना आहे जी हवामान बदलांच्या परिणामांचे स्पष्ट उदाहरण आहे. सरकारने आणि नागरी समाजाने एकत्रितपणे काम करून, भविष्यातील आपत्तींच्या परिणामांना कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. सरकारने आपत्ती व्यवस्थापन प्रणालीला सुधारण्याची गरज आहे, आणि नागरी समाजाने एकत्र येऊन एकमेकांना मदत करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोकणातील लोकांचे धैर्य प्रेरणादायी आहे, परंतु त्यांनी असे संकट एकट्याने सहन करणे योग्य नाही. सरकारने तत्काळ आणि संवेदनशीलतेने आपली जबाबदारी पार पाडावी.



# निसर्ग संवर्धन- काळाची गरज!

## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.



आज जागतिक निसर्ग संवर्धन दिन. सध्याचा काळ आणि निसर्गाची मानवाने चालविलेली अवहेलना बघता आजच कशाला, अगदी दररोजच निसर्ग संवर्धन करावयास हवे असे वाटण्याइतपत निसर्गाची सध्याची अवस्था 'नाजूक' बनली आहे. मात्र तरीही समाजातील काही व्यक्ती किंवा घटक निसर्ग संवर्धनाचे कार्य अविरतपणे करीत आहेत. यांपैकी अनेकांचे कार्य तसे प्रकाशझोतात येत नाही. सुनील कदम हा असाच एक निसर्गप्रेमी. त्याला 'निसर्गदूत' असे म्हटले तरीही चालेल. तो दापोलीत राहतो, म्हणजे त्याच्या दापोलीपासून पंधरा किलोमीटर अंतरावर असलेल्या अडखळ गावात राहतो. तो बालपणापासूनच संवेदनशील मनाचा कवी. दापोलीच्या साहित्यिक वर्तुळात त्याचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. प्रेमाच्या कविता लिहीण्यापेक्षा तो ज्या निसर्गावर जीवापाड प्रेम करतो, त्या निसर्गावरच तो जास्त करून कविता लिहीतो, एखाद्या कट्ट्यावर सादर करतो.

निसर्ग, पर्यावरण, ग्लोबल वार्मिंग वगैरे विषय मिळाला की तो अगदी भरभरून बोलतो. फक्त बोलतोच असे नाही तर निसर्गासाठी काही करण्यासाठीच्या उपाययोजनांमध्येही तो आघाडीवर असतो. निसर्ग संवर्धन, पर्यावरण यांसारख्या संवेदनशील विषयावर त्याच्या सुपीक डोक्यात विविध कल्पना असतात. तो मला कधी भेटतो तेव्हा याच विषयावर आमच्या गप्पा होतात, काहीबाही ठोस करावयाचे ठरवले जाते.

दापोलीतील कवी, कलाकार, पत्रकार, निसर्गप्रेमी माणसांना हाताशी धरून सुनीलने एक 'क्षितिज कला मंच' नावाची संस्था सुरु केली आहे. या संस्थेच्या माध्यमातून सुनील दापोली शहर व परिसरात सातत्याने काही ना काही समाजोपयोगी उपक्रम व कार्यक्रम राबवीत असतो. विविध प्रकारच्या साहित्यिक, सांस्कृतिक स्पर्धा, पर्यावरणविषयक परिसंवाद, चर्चा, व्याख्यानांचे आयोजन ही क्षितिज संस्था नेहमीच करत असते. दापोली शहरातील प्रसिद्ध आझाद मैदानात काही 'कंटक' लोकांनी टाकलेला कचरा गोळा करण्याची एक महत्वाकांक्षी मोहीम सुनीलच्या 'क्षितिज' ने दोन महिन्यांपूर्वी पार पाडली. दापोलीचे आझाद मैदान म्हणजे साधेसुधे मैदान नाही. पुर्वीच्या काळात हे मैदान म्हणजे इंग्रज सैनिकांचा लष्करी तळ होता. इंग्रज सैन्याचे कोकणासाठीचे लष्करी संचलन, सराव व कवायती याच मैदानावर चालत असत. मात्र आज या मैदानाचा कोपरान कोपरा प्लास्टिक हे.
पिशव्या, रॅपर्स, नवीन बांधकाम करणाऱ्यांनी ओतलेला जुन्या बांधकामाचा 'कचरा', दारुच्या बाटल्या यांसारख्या वस्तुंनी भरलेला. तरीही हा कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याचे काम क्षितिजच्या टीमने केले. कदाचित त्यामुळेच आज आझाद मैदान किंचित का होईना पण मोकळा श्वास घेत आहे. यंदाच्या एप्रिल महिन्यात सुनीलने बोलता बोलता एक कल्पना सुचवली. ती अशी की, सध्या 'हापूस' च्या जमान्यात रायवळ किंवा जंगली आंब्यांना कोणी वाली नाही. खरे तर, कोणतीही रासायनिक फवारणी न करता, कोणतेही 'उत्तेजक' न पाजता निसर्गतःच येणारे रायवळ आंबे खरे पौष्टिक. पण आता त्यांच्याकडे कोणी फिरकतही नाही, त्यांचे कोणाला अप्रुप नाही. आज रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली इंग्रजांनी लावलेले आम्रवृक्षही भुईसपाट होत आहेत. आता कोकणचा झालेला आंबा खरे तर मुळचा आफ्रिकन. पण इंग्रज लोकांनी तो भारतात आणला. आज हाच आंबा कोकणची ओळख बनला आहे. मात्र आजच्या कोकणाला या रायवळ आंब्याची अपुर्वाई राहिलेली नाही. पण सुनीलचे स्वप्न हे आहे की, कोकणातील जागोजागी परत असे आम्रवृक्ष उभे रहायला हवेत. फांद्यांफांद्यांनी डवरायला हवेत. त्यांच्यावर आंबे लागायला हवेत, आंब्यांखाली मुले खेळायला हवीत. सुनील म्हणाला, "यंदा आपण अशाच आंब्यांच्या पारंब्या जमवूया. फक्त आंबेच नको तर, ज्या ज्या जंगली झाडांच्या बिया मिळतील त्या गोळा करूया. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच त्या बिया दापोली जवळच्या रानावनात पेरुया. अगदी थोड्याफार जरी बिया रुजल्या, तेवढी झाडे जगली, तरी आपली दापोली परत हिरवीगार व्हायला वेळ लागणार नाही. यंदाच्या उन्हाळी सुट्टीत सुनील, त्याची क्षितिजची टीम संपूर्ण दापोली तालुक्यात फिरले. तालुक्यातील सर्व शाळांमधून त्यांनी विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टीत रानबिया जमविण्याचे आवाहन केले. विशेष म्हणजे सुनीलच्या आवाहनास सकारात्मक व भरघोस प्रतिसाद देत अनेक विद्यार्थ्यांनी हजारो रानबिया गोळा केल्या. आंबा, फणस, काजू, शिवण, कोकम, जांभूळ, हरडा, हेळा, बोर, आलू यांसारख्या अनेक जंगली झाडांच्या हजारो बिया क्षितिजच्या टीमने प्रत्येक शाळेत जाऊन संकलीत केल्या. जास्तीत जास्त रानबिया गोळा करणाऱ्या विद्यार्थ्यांना क्षितिजने आकर्षक बक्षीसे दिली. सुनीलच्या कल्पनेतील हा उपक्रम कमालीचा यशस्वी झाला.

आजच्या जागतिक निसर्ग संवर्धन दिनाचे निमित्त साधून सुनीलच्या क्षितिजने जमविलेल्या सर्व रानबिया दापोली तालुक्यातील मोकळ्या माळरानात, दाट जंगलात जाऊन पेरण्याची, रुजत घालण्याची मोहीम सुरु केलीय. दापोली हे तसे मिनी महाबळेश्वर म्हणून ओळखले जाते. येथील हवामान ऐन उन्हाळ्यातही आल्हाददायक असते. मात्र 'विकासाचा' पोकलेन आता दापोलीतही ठिकठिकाणी थैमान घालू लागला आहे. ठिकठिकाणचे डोंगर भुईसपाट होत आहेत, जंगले नष्ट होत आहेत. काल परवापर्यंत हिरवीगार दिसणाऱ्या, हिरवाईने नटलेल्या दापोलीचा चेहरा आता पार बदलल्यासारखा दिसत आहे. मात्र असे असले तरी सुनीलसारख्यांचे चिमुकले हातही आता कामाला लागले आहेत. दापोलीला तिचे पुर्वीचे रूप बहाल करण्याचा जणु त्यांनी विडाच उचलला आहे. तो परमेश्वर त्यांच्या या विराट कार्यात त्यांना साथ देऊदे, त्यांच्या हातांना बळ देऊदेत हीच आजच्या जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त मनोकामना!

# मूल निरागस हो

## या लाडक्या मुलांनो



प्रवीण कुबल,
शिडवणे, ता. कणकवली.

मुलांनो , तुम्हाला आज एक विनंती करायची आहे. कृपया खोटे कधी बोलू नका. तुम्ही एखादी घटना पाहता किंवा ऐकता , ती तुम्हाला दुसऱ्यांना सांगायची असल्यास जरुर सांगा , पण त्यात स्वतःच्या मनाचे काही घालू नका. मीठ मसाला लावू नका. जे ऐकले , पाहिले ते तसेच सांगण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करा. जमेल ते तुम्हाला. प्रयत्न केलात तर ते अशक्यही नाही.

तुम्ही त्यात तुमच्या मनाच्या गोष्टी घालण्याचा वेडेपणा करता आणि अर्थाचा अनर्थ करता. त्यामुळे बऱ्याच वेळा नुकसान होण्याचीच जास्त शक्यता असते. ज्यांना खरेपणा आवडतो ना , त्यांना मस्करीतही खोटे बोलणे पटत नाही. म्हणून माझे तेच खरे म्हणू नका , नेहमी खरे ते माझेच असे म्हणा. हेही तुम्हाला अधिक प्रयत्नाने जमेल.

तुम्हाला कधी कोणाला कसले वचन द्यायचे असेल , तर पुनःपुन्हा विचार करा. आपल्याला अशी सवय असू शकते. मी असे करणार आहे , तसे करणार आहे. पण करत मात्र काहीच नाही. या अशा गोष्टींमुळे तुमच्यावर इतरांचा विश्वास बसत नाही. तुम्ही लबाड आहात असे कोणी म्हटले तर तुम्हाला ते आवडेल का ? नाही ना ? मला वाटलेच होते. तुम्ही लबाडी करणार नाही आणि लबाड म्हणवून घेणार नाही. तुमच्यावर सर्वांनी सदासर्वकाळ विश्वास ठेवावा अशी वागणूक ठेवा. बघा तुम्हाला किती आनंद होतो ते !!!

तुमच्या हातून एखादी चूक घडली तर लगेच मान्य करा. सबब सांगू नका. तुम्हाला जरी भीती वाटत असली तरीही चुकीची कबुली दिल्यामुळे तुम्हाला शिक्षा मिळाली तर तिचा खुल्या दिलाने स्विकार करा. कदाचित तुम्हाला शिक्षा मिळणारही नाही. पण शिक्षा मिळत नाही म्हणून खरे बोलावे हेही बरोबर नाही. खरे बोलणे हा तुमच्या आतील सत्याचा विजय असतो हे नेहमी ध्यानात ठेवा.

तुम्हाला कोणी रागावल्यास तेही सहन करण्याची शक्ती तुमच्यात यायला हवी. तुमच्या डोळ्यांतील पाणी त्याचे साक्षीदार असते.

दुसऱ्यांना दुःख देऊन जर तुम्हाला आनंद वाटत असेल तर हिच खूप वाईट गोष्ट आहे. अशा वाईट गोष्टी मनात आल्या तर त्या घालवून द्या . तुमच्याबाबतीत असे घडेल तर तुम्हाला बरे वाटेल काय ? नाही ना ? प्राणिमात्रावर दया करा. त्यांना दुःख देऊन आपणांस सुख मिळत असेल असे तुम्हाला वाटत असेल तर तीही चुकीची गोष्ट आहे.



तुम्ही एखाद्या बागेत गेला आहात , तेथील फुलपाखरे पाहून तुम्हाला खूप आनंदही झाला असेल. तो आनंद तसाच जपून ठेवा. फुलपाखरांना पकडून त्यांचे पंख कुस्करुन त्यांच्या सुखाचे दुःख करु नका. तुम्ही असे कधी केले असेल तर आता पुढे तरी करु नका. तुम्ही निरागस आहात , आणि निरागसच राहा.



## कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी- भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.

# गृहनिर्माण संस्थेतील सदनिका गाळा खरेदी व त्याअनुषंगाने खरेदीखत


आज काल गृहनिर्माण संस्थेमधील सदनिका खरेदी हेच सर्वसामान्य माणसाचे स्वप्न बनले आहे स्वतंत्र घर खरेदी ही काही अपवाद वगळता व काही खेडेगावतील खरेदी वगळता ही कल्पनाच हळूहळू लोप पावत चालली आहे आणि त्यामुळेच गृहनिर्माण संस्था व आदी तत्सम अपार्टमेंट सारख्या संस्थेतील सदनिका खरेदी वा गाळा ,दुकान खरेदी आणि त्या अनुषंगाने केले जाणारे खरेदीखत या बाबत सर्व सामान्य माणसाचा गोंधळ उडू लागला आहे

वर दर्शवल्याप्रमाणे अश्या खरेदीच्या वेळी विकत घेण्याचा करारनामा म्हणजेच ज्याला इंग्रजी मध्ये **ॲग्रिमेंट फॉर सेल** असे म्हटले जाते ते केल्यावर वेगळे खरेदीखत म्हणजे ज्याला इंग्रजी मध्ये **कन्व्हेन्स डीड** असे म्हटले जाते ते बनवले जाते तर काही ठिकाणी ते बनवले जात नाही. मग असा फरक का असा प्रश्न सर्वसामान्य माणसाच्या मनामध्ये उभा राहतो वास्तविक दोन्ही ठिकाणी खरेदीदाराला ताबा मिळतो त्याच्या नावे भाग प्रमाणपत्र ज्याला आपण इंग्रजी मध्ये शेअर सर्टिफिककेट असे म्हणतो ते देखील हस्तांतरित होते मग असा फरक का?

**यातील कायदेशीर भाग हा सर्वसामान्य माणसाला समजाऊन सांगण्यासाठीचा हा लेख प्रपंच!**

जेव्हा एखाद्या अचल मालमत्तेची मालकी बदलली जाते त्या वेळी खरेदीखत अथवा तत्सम कोणते तरी नोंदणीकृत कागदपत्र बनवणे आवश्यक असते उदारणच देऊन बोलायचे झाल्यास हक्क सोडपत्र, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र इत्यादि ज्या मूळे त्या मालमत्तेची मालकी एका व्यक्तीकडून। दुसऱ्या व्यक्तीकडे अथवा एका संस्थेकडून दुसऱ्या संस्थेकडे हस्तांतरित होते जेणेकरून मालकी हक्क दर्शवणाऱ्या कागपत्रावर म्हणजे जमीनीचा 7/12, मालमत्ता पत्रक, सनद इ ठिकाणी जुन्या मालकाचे नाव जाऊन नवीन मालकाचे नाव त्या सर्व कागदपत्रांवर चढवले जाते अशा वेळी जर सदर मालमत्ते ची खरेदी विक्री झाली असेल तर त्यावेळी निश्चितपणे खरेदी खत बनवणे आवश्यक असते. पुष्कळ वेळा खेडेगावात जमीन व्यवहार होतात घर विक्री व्यवहार होतात त्यावेळी पहिल्यांदा बयाणा चिठ्ठी अथवा इसार चिठ्ठी बनवली जाते. यालाच इंग्रजीमध्ये **एग्रीमेंट फॉर सेल** असे म्हणतात. त्यानंतर रीतसर मुद्रांक शुल्क भरून सदर व्यवहार हा पूर्ण करताना खरेदीखत बनवले जाते व जुन्या मालकाला त्याचा पूर्ण मोबदला दिल्यामुळे हा दस्तऐवज उभय पक्षकार बनवतात आणि त्यानंतर सर्व मालकी हक्क दर्शवणाऱ्या कागदपत्रावर मालकी हक्कात बदल दर्शवला जातो .

आता हीच सर्व कागदपत्रे सदनिका अथवा गाळा अथवा दुकान खरेदी करताना बनवल्यास संस्थेच्या भाग




प्रमाणपत्रावर खरेदी दाराचे, बक्षीस घेणाऱ्याचे, हक्कसोडपत्र करून घेणाऱ्याचे नाव दाखल होते. पण तसाच बदल एखाद्या व्यक्तीने फक्त रजिस्टर अग्रीमेंट फॉर सेल बनवले व विकणाऱ्या व्यक्तीला त्याचा पूर्ण मोबदला दिला व संबंधित मालमत्तेचा ताबा घेऊन उपविधित नमूद केल्याप्रमाणें सर्व अर्ज , डीक्लरेशन बनवून दिल्यास त्याचेही नाव भागप्रमाण पत्रावर



दाखल केले जाते. मग या व्यतिरिक्त आणखीन खरेदीखत कशासाठी बनवतात हा प्रश्न अनुत्तरित राहतो. मग असे खरेदीखत काही जण का बनवण्याचा आग्रह धरतात याचा खुलासा आपण आपल्या वाचकां साठी या ठिकाणी करत करत आहोत

मुळातच या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की एखाद्या सोसायटी ची बिल्डिंग ही त्या सोसायटीच्या मालकीची असते ती कोणा ही व्यक्तिगत मालकीची नसते. त्यामुळे मालमत्ता पत्रक, सातबारा आदी ठिकाणी गृहनिर्माण संस्थेचेच नाव दाखल झालेले असते. आता एखाद्या गृहनिर्माण संस्थेचा एखादा सदस्य आपली सदनिका अथवा गाळा विकतो त्यावेळी तो जरी त्या सदनिकेचे गाळ्याचे मूल्य घेत असला व सदनिका अथवा गाळा विकत देणाऱ्याला त्या मालमत्तेचे मूल्य देत असला तरी मूल्य स्वीकारणारा तांत्रिक दृष्ट्या मालक नसतो गृहनिर्माण संस्था हिच तांत्रिक दृष्ट्या सर्व मालमत्तेची मालक असते आणि मग त्या गृहनिर्माण संस्थेतील सदनिकागाळा हा त्याला सदस्य या नात्याने वापरण्याचा अधिकार असतो आणि हा अधिकार तो दुसऱ्या व्यक्तीला विकतो व त्याला त्याच्या ताब्यात असलेला भाग म्हणजेच सदनिका अथवा गाळा हा वापरण्याचा अधिकार हस्तांतरित करत असतो. त्यामुळे खरेदीदारास ती सदनिका अथवा गाळा वापरता येतो. म्हणजे या ठिकाणी राईट ऑफ आक्युपेशन हा हस्तांतरित होतो. मालकी हक्क हस्तांतरित होत नाही आणि म्हणूनच त्याचे नावे शेअर सर्टिफिकेट होते परंतु प्रॉपर्टी कार्ड ला त्याचे नाव दाखल होत नाही. म्हणूनच तांत्रिकदृष्ट्या मालकी बदलत नाही.

त्यामुळे गृहनिर्माण संस्थेतील सदनिका गाळा विक्रीचे वेळी जर एग्रीमेंट फॉर सेल हे योग्य मुद्रांक शुल्क भरून व नोंदणी करून बनवले व सर्व मोबदला सदनिकाधारकाला, गाळा धारकाला दिला आणि त्याच्याकडूनच सादर सदनिकेचा ताबा घेतला तरीसुद्धा विकत घेणाऱ्याला त्या सदनिकेचा वापर करण्याचा हक्क प्राप्त होतो त्या ठिकाणी खरेदी खत केले नाही तरी त्याच्या हक्कांवर कसलीही गदा येत नाही.

आता काही लोक अशाप्रकारे एग्रीमेंट केल्यावर देखील कन्व्हेन्स डीड म्हणजे खरेदीखत देखील बनवतात तरीसुद्धा विकत घेणाऱ्या व्यक्तीच्या हक्कात काही वाढ होत नाही मात्र अशा प्रकारे जर खरेदीखत बनवले तर ते उत्तमच असते त्यामुळे जरी अधिकारात वाढ होत नसली तरीसुद्धा एक कागदोपत्री पुरावा आपोआप तयार होतो. त्यामुळे असे खरेदीखत करणे सहज शक्य असेल तर अवश्य करावे कारण असे खरेदीखत करायला वेगळे मुद्रांक शुल्क लागत नाही रुपये १०० च्या मुद्रांका वर देखील असे खरेदीखत होते व ते रजिस्टर देखील होते. त्यामुळे जर असे खरेदीखत सहजतेने होत असेल, दोन्ही पक्षकार त्यासाठी तयार असतील तर ते करून घेणेच इष्ट होईल.

मात्र त्यासाठी अव्वाच्या सव्वा पैसे खर्च करण्याची जरुरी नाही काहीवेळा संस्थेचे सदस्य अशा गोष्टींसाठी जिवाचा आटापिटा करतात आणि नाहक खर्च करतात. त्यामुळे प्रत्येकाने ही गोष्ट लक्षात ठेवली तर त्यांचा फायदाच होईल थोडक्यात नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेतील एखादी मालमत्ता विकत घेताना योग्य ते मुद्रांक शुल्क भरून जर एग्रीमेंट फॉर सेल रजिस्टर केले असेल आणि त्या सदनिकेचे अथवा गळ्याचे कन्व्हेन्स करायचे राहून गेले असले तरी घाबरून जाण्यासारखे काही नाही. असे खरेदीखत झाले नाही तरी डीम कॉन्व्हेयन्स करताना देखील काही अडचण निर्माण होत नाही. त्यामुळे कसलाच तोटा सहन करावा लागणार नाही.

**कित्येक वेळा अशा प्रकारच्या छोट्या छोट्या गोष्टींमुळे संस्थेचे सदस्य त्रास करून घेतात अथवा काही लोक त्याचा गैरफायदा घेऊन काही तरी मोठी गोष्ट राहिली आहे असा आभास निर्माण करून संबंधित सदस्यांना घाबरवण्याचे काम करतात. त्यांना दिलासा देण्यासाठी हा लेखनप्रपंच.**

**वटवृक्षनिवासी प. पू. श्री नामदेव महाराज जन्मोत्सव सोहळा**
-

वटवृक्ष निवासी प. पू. श्री नामदेव महाराज जन्मोत्सव सोहळा आबाढ कृष्ण त्रयोदशी शुक्रवार दि. ०२ ऑगस्ट २०२४ रोजी आंदुर्ले गावात साजरा होत आहे. आपण सहकुटूंब, सहपरिवार, मित्रमंडळीसह उपस्थित राहून श्रीसेवेचा, तीर्थ व महाप्रसादाचा, कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे. या निमित्ताने मठात साजरा होणार्या कार्यक्रमाची रूपरेखा पुढील प्रमाणे -

★ **मठातील कार्यक्रम**

आषाढ कृष्ण त्रयोदशी शुक्रवार दि. ०२ ऑगस्ट २०२४ रोजी
सकाळी ८.०० वा. श्रींचे पादुका पुजन, पंचामृत स्नान, अभिषेक
यजमान सौ. व श्री. पांडूरंग श्रीकृष्ण पडते, कुडाळ

सुश्राव्य भजन प.पू. श्री नामदेव महाराज भजन मंडळ, सिंधुदुर्ग
सकाळी११.०० वा.श्रींची आरती, नैवेद्य-तिर्थप्रसाद

दुपारी १२.३० वा.महाप्रसाद दुपारी १ वा. पासून सुश्राव्य भजन
दुपारी २ ते ३ वा.दुपारी ३ ते ४ वा.
सुश्राव्य गीत गायन कु. सुनिल गोसावी आणि सहकारी, पाट

सायं. ४ ते ७ वा.
सुश्राव्य किर्तन ह.भ.प. सौ. स्नेहल पित्रे, डोंबिवली- मुंबई

सायं. ७.०० वा.श्रींची नित्य सांजआरती
सायं.७.३० वा.श्रींची पालखी प्रदक्षिणा
रात्रौ ८ वा. पासून सुश्राव्य वारकरी व संगीत भजने
पहाटे ४.०० वा. काकड आरती (ब्राम्हण प्रासादिक भजन मंडळ, पागेरेवाडी-खवणे)

आपले नम्र

प. पू. संत सद्गुरु श्री नामदेव महाराज सेवक भक्त मंडळ व ग्रामस्थ
**आंदुर्ले, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.**
**शुक्रवार दि. ०२ ऑगस्ट २०२४ रोजी**
**स्थळ : वटवृक्ष निवास, आंदुर्ले**

**टिप -**
- दर गुरूवारी मठामध्ये अन्नदान सुरू असून ज्या भक्तांना अन्नदान सेवा करावयाची आहे त्यांनी खालील व्यक्तींशी संपर्क साधावा.
- श्री. मनोहर राऊळ (पुजारी) **मो. ९४०३५६०४१८,** डॉ. दिपक ठाकूर, **मो. [illegible]**

# अनधिकृत फेरीवाल्यांच्या विळख्यात मुंबईकर !



जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
संपर्क करा. ९६६४५५९७८०

'मुंबई महानगरपालिका, म्हाडा, पोलीस यांच्याकडून न्यायालयाच्या आदेशांचे पालन केले जात नाही, अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न गंभीर बनला आहे. पोलिसांना अनधिकृत फेरीवाल्यांना हटवता येत नसेल, तर सैन्याला बोलवायचे का ?' अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने आपली उद्विग्नता नुकतीच व्यक्त केली आहे.

मुंबई आणि उपनगरे येथील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी मुदत देऊनही न्यायालयाच्या आदेशाचे पालन न झाल्याने न्यायालयाने वरील शब्दांत पोलीस आणि मुंबई महानगरपालिकेला फटकारले आहे. वाढत्या लोकसंख्येचा मुंबई शहरावर पडणारा अतिरिक्त भार, रस्ते रुंदीकरण, उड्डाणपूल, मेट्रो रेल्वेमार्ग यांसारख्या विकासकामांमुळे रस्त्यांची झालेली दुर्दशा, त्यातच शहरातील वाढत्या वाहनांमुळे ठिकठिकाणी होणारी वाहतूक कोंडी यांमुळे शहराचा श्वास कोंडतो आहे,

रेल्वे स्थानक, बस स्थानक आदी गर्दीच्या ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा असणारे पदपथ अनधिकृत फेरीवाल्यांनी व्यापल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी चालायचे कोठून असा प्रश्न प्रतिदिन निर्माण होत आहे. त्यातच या फेरीवाल्यांनी सारे मार्ग दुतर्फा व्यापून टाकल्यामुळे त्यांच्या मागे असलेली अधिकृत दुकाने जी सरकारला वेळच्या वेळी कर भरतात ती झाकोळली जात आहेत. ज्याचा परिणाम या व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर होत आहे.

महानगरपालिका अधिकारी आणि पोलीस यांपैकी कोणीच या अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करत नसल्याने आणि केली तरी ती केवळ नावापुरती असल्याने फेरीवाल्यांपासून सुटका करण्यासाठी सातत्याने कोणीनाकोणी न्यायालयाचे दरवाजे ठोठावत असतात.

२०१७ साली मुंबईतील एल्फिन्स्टन (आताचे प्रभादेवी) रेल्वे स्थानकाच्या पुलावर झालेल्या दुर्घटनेतून बोध घेऊन पालिका प्रशासनानेही मुंबईतील रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरावर पांढरे पट्टे आखून त्यांच्या आतील परिसरात फेरीवाल्यांना बसण्यास मज्जाव करणारा नियम बनवला. त्यानंतर या पट्ट्याच्या आत फेरीवाले बसणार नाहीत याची काळजीही प्रशासनाकडून काही दिवस घेण्यात आली;



मात्र थोड्याच दिवसांत हा नियम बासनात बांधून रेल्वे स्थानकाजवळ पुन्हा फेरीवाले बसू लागले. रेल्वे स्थानकांजवळ रस्त्यांच्या दुतर्फा पदपथ फेरीवाल्यांनी व्यापल्यामुळे लोकांना रस्त्यावरून मार्गक्रमण करावे लागते. गर्दीच्या वेळी रस्त्यांवरील वाहतुकीच्या कोंडीमुळे त्यांतून वाट काढताना अक्षरशः नाकीनऊ येतात. फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी अधूनमधून महापालिकेची गाडी परिसरात फिरते मात्र ती येणार असल्याची बातमी फेरीवाल्यांना आधीच मिळाल्याने ते आपला माल झाकून ठेवून दूर निघून जातात. गाडी तेथून निघून गेली कि हे अनधिकृत फेरीवाले पुन्हा त्या ठिकाणी आपले बस्तान मांडतात. मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या परिसरात अनधिकृतपणे बसणाऱ्या फेरीवाल्यांमध्ये बांगलादेशी तरुण मोठ्या प्रमाणात असल्याचे मध्यंतरी उघड झाले होते. या फेरीवाल्यांना बस्तान मांडण्यासाठी पदपथांवर जागा उपलब्ध करून देणे, त्या ठिकाणी विजेचे कनेक्शन उपलब्ध करून देणे, भांडवल उपलब्ध करून देणे, पोलीस आणि महापालिका यांच्या कारवाईपासून त्यांना वाचवणे यासाठी प्रत्येक रेल्वेस्थानक परिसरात म्होरके कार्यरत असून या म्होरक्यांचे महापालिका अधिकारी, स्थानिक पोलीस आणि लोकप्रतिनिधी यांच्याशी आर्थिक हितसंबंध असतात ज्यामुळे त्यांचे हे धंदे वर्षोनुवर्षे बिनदिक्कतपणे सुरु आहेत. मुंबई-ठाण्यासारख्या मराठीबहुल शहरांत बहुतांश फेरीवाले हे परप्रांतीयच आढळून येतात. हे अनधिकृत परप्रांतीय फेरीवाले त्यांच्याकडे येणाऱ्या ग्राहकांसोबत अरेरावीने वागतात, त्यांच्याकडून वस्तू खरेदी न केल्यास ग्राहकांशी विनाकारण वाद घालतात. या मुजोर फेरीवाल्यांकडून स्थानिक ग्राहकांना आणि रहिवाशांना मारहाण झाल्याच्या घटना यापूर्वी बदलापूर, ठाणे, घाटकोपर यांसारख्या ठिकाणी घडल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांपेक्षा अनधिकृत फेरीवाल्यांची अधिक काळजी घेणाऱ्या महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाला न्यायालयाच्या आदेशानंतरही या अनधिकृत फेरीवाल्यांना हटवायचे नसेल तर नागरिकांच्या सुरक्षेसाठी भविष्यात सैन्याला पाचारण करण्याची वेळ आल्यास आश्चर्य वाटायला नको !

---

# माफी मागायला आणि माफ करायला शिका

## मनाचिये गुंति...



सुभाष भाऊ चोपडे,
पाचल, ता. राजापूर.

या पृथ्वीतलावर असा एकही जीव नाही की तो चूक करत नाही.ती अनवधानाने तरी होते नाहीतर जाणूनबुजून तरी केली जाते.चुकून झालेल्या चुकीबद्दल कालांतराने पश्चात्ताप व्यक्त केला जातो.पण जी व्यक्ती मनात ठरवून चूक करत असते ती स्वतः चुकांच्या मालिकेत गुरफटत असते याची तिला जाणीव होत नाही.पण तिच्या चुकांमुळे इतरांचे मात्र नुकसान होत असते.समोरच्या व्यक्तीला जाणीव होत असते की आपले कोणामुळे नुकसान होत आहे पण ती व्यक्ती काहीही न करता त्या व्यक्तीला मनोभावे माफ करते.याचा अर्थ असा की,स्वतःला त्रास होत असला तरी समोरच्या व्यक्तीला माफ करणे हे मोठ्या मनाचे लक्षण आहे.मुळात प्रत्येकाने आपल्याकडून चूक होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे पण तरीही एखादेवेळी चूक झाली तर त्याची माफी मागायला मागे फिरायचे नाही.एक चूक लपवताना हजारो चुका आपल्या हातून घडू नयेत याची जाणीव ठेवायला हवी.

पुराणकाळापासून आपण अनुभवत आलो आहोत की, चुकीच्या पद्धतीने जीवन व्यतीत करणाऱ्या माणसाच्या आयुष्याचा शेवटही तितकाच वेदनादायी होतो.आपला आचार,आपला विचार वाईट मार्गाने होणार नाही,झालाच तर त्याबद्दल माफी मागावी आणि मनावरचं ओझं हलकं करावं.जी माणसं जाणूनबुजून सतत चुका करत असतात त्यांच्या मनाची शांतता कधीच लोप पावलेली असते.ती ना समाधानाने झोपू शकतात ना आनंदाने जगू शकतात.आपल्या चुकीमुळे ज्यांचं नुकसान ते करू पाहतात तीच व्यक्ती मात्र कशाचीही दुःख व्यक्त न करता आपल्या समोरची परिस्थिती हाताळत असते.पण याचा त्रास या चूक करणाऱ्या माणसाला अधिक होतो.एकदा -दोनदा चूक झाली ही वेगळी गोष्ट पण पुन्हा पुन्हा तीच चूक एखादी व्यक्ती करत असेल तर ती व्यक्ती माफी मागायला आणि तिला माफ करायलाही लायक नसते.

समाजात अशा कितीतरी व्यक्ती असतात की,त्या अशा चुका वारंवार करत असतात.का कोण जाणे त्यांना दुसऱ्याचे चांगले पाहवत नाही की दुसऱ्याची प्रगती आवडत नाही.मग समोरची व्यक्ती अडचणीत सापडेल याचे डाव टाकले जातात आणि स्वतः च्या चुकीने दुसऱ्याला त्रास दिला जातो. पण या कलियुगात जे इथे करायचे ते इथेच फेडावे लागते याची कल्पनाही ठेवली तर आपल्या हातून काही चुका टाळल्या जातील. खूप कमी माणसं असतात जी आपल्या हातून घडलेल्या चुकीबद्दल पश्चात्ताप व्यक्त करतात, मनोभावे माफी मागतात. याचा अर्थ ती मनाने चांगलीच असतात पण त्यांच्याकडून ती चूक चुकूनच झालेली असते. स्वतः ची चूक कबूल करणे हेही मोठ्या मनाचे लक्षण आहे. त्याचबरोबर मोठ्या मनाने माफ करणे हेही तितकेच श्रेष्ठ असते. इतिहासात 'ध' चा 'मा'झाला आणि किती किती भयानक परिस्थिती निर्माण झाली याचे चिंतन करूया. जी माणसं आपल्या चुका कबूल न करता जगण्याचा प्रयत्न करत असतात त्यांचे मन सतत त्यांना खायला उठते. आपल्या चुका कोणाला कळणार नाहीत ना? या भीतीची टांगती तलवार त्यांच्या डोक्यावर लोंबकळत असते. मनाला शांतता लाभत नाही की झोप लागत नाही.

आयुष्यात खूप काही चांगले करण्यासारखे आहे मग आपण वाईट का करावं?आपल्यामुळे दुसऱ्यांना त्रास का व्हावा? माझ्या चुकीने दुसऱ्याचे सुख का उध्वस्त करावे?याचा विचार मनात रुंजी घालत राहिला तर आपल्या हातून होणाऱ्या चुका टाळल्या जातील.प्रत्येकाने एकदा शांत चित्ताने चिंतन करून आपल्या मनाला प्रश्न विचारावा की,आपण कोणती चूक केली आहे का? केली असेल तर या चुकांची संख्या किती? त्याचबरोबर मला यामुळे काय मिळाले? या चुकीमुळे दुसऱ्याचे काय घडले?याचा विचार मनापासून करा. या चुकांची संख्या अधिक असेल तर आपले जगणे अयोग्य मार्गाने मार्गक्रमण करत आहोत हे आपल्याच मनाला समजावून सांगा.केली असेल चूक पण त्याची मनापासून माफी मागितली तर काय होणार आहे. उलट आपल्याच मनाला समाधान लाभणार आहे.गैरसमजुतीला वाव मिळणार नाही.आपल्या हातून चांगले नाही करता आले तर वाईटही कोणाचे होणार नाही. आपल्या चुकीबद्दल मनापासून माफी मागा, मनावरचं ओझं हलकं करा. आयुष्य तणावमुक्त जगा. जगण्याचा आनंद घेता आला पाहिजे तो दिलखुलास घ्या. माफी मागणाऱ्यालाही मनापासून माफ करा. प्रेमाची, आपुलकीची मनाची कवाडे सताड उघडी ठेवा.

जन्म एकदाच मिळतो सार्थकी लावूया. घडलेल्या चुकीबद्दल माफी मागायला आणि मोठ्या मनाने माफ करायला शिकूया. शेवटी कळत नकळत माझ्या हातून चूक घडली असेल आणि कोणाचे नुकसान झाले असेल तर मला माफ करा. माफ करायची वेळ माझ्यावर आलीच तर मी सदैव तयारच आहे.

# आध्यात्मिक वास्तुशास्त्र

## अध्यात्म



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

देवाधर्माची आवड मला लहानपणापासूनच होती. माझ्या वडिलांना धार्मिकतेची आध्यात्मिकतेची ओढ होती. ज्योतिषशास्त्राचा त्यांचा व्यासंग व अभ्यास होता. त्यांनी केलेली भाकीते ही तंतोतंत खरी ठरलेली आहेत. भाकीते खरे ठरण्याचे श्रेय माझे वडील पुज्य कै. वसंतदादा गणपत दुदवडकर हे कधी स्वतःकडे घेत नसत तर ते ज्योतिषशास्त्राची रचना करणाऱ्या त्रिकालज्ञानी महर्षींना ते श्रेय समर्पित करीत. मी बारावीची परीक्षा दिल्यानंतर अल्पावधीतच वडील निवर्तले. कुटुंबाची धुरा माझ्यावर पडली आणि आर्थिक स्थैर्यासाठी मी जंग पछाडले. मात्र कित्येक वर्षे स्थिरता येत नव्हती. मग वडिलांनी तयार केलेल्या जन्मपत्रिकेचा आधार घेऊन मी पुढील वाटचाल करू लागलो. थोडाफार फरक पडत गेला तरी घरात स्थैर्य मात्र काही केल्या लाभत नव्हते. वडिलांनी उत्तमपैकी बांधलेले घर सोडून आर्थिक साधनेसाठी मला अस्थिरपणे इकडे तिकडे राहावे लागले. नोकरी-धंद्यासाठी भटकंती करावी लागली. अखेर कालांतराने पत्नी निवर्तल्यानंतर दोन कन्यांना घेऊन मी पुन्हा माझ्या बुरंबावडे गावी घर गाठले आणि घर सोडून कुठेही न जाण्याचे ठरवले. परंतु स्थैर्य लाभत नव्हते. अडचणींवर अडचणी येत होत्या. जीवन अत्यंत संघर्षमय झाले होते. चिकाटीने धैर्य राखूनही पार निराश झालो होतो मी. वडिलांनी माझ्या जन्मपत्रिकेत मार्गदर्शन लिहिल्याप्रमाणे मी ज्योतिषशास्त्राकडे वळलो. त्या अनुषंगाने हस्तसामुद्रिक विद्या, वास्तुशास्त्र आणि अंकशास्त्र यांकडेही वळलो. वास्तुशास्त्राप्रमाणे आमच्या घराचे मी परीक्षण केले असता आमच्या वास्तूमध्ये अनेक दोष आढळले. दोष निवारण करण्यासाठी आर्थिक परिस्थिती नव्हती. मग टप्प्याटप्प्याने विना तोडफोड उपायांचा अंमल करीत वास्तुत वास्तुशास्त्रानुसार काही बदल केले. हे बदल करीत असताना मी जे काही प्रयोग करीत होतो, उदाहरणार्थ घरातील देव्हाऱ्याच्या जागा बदलणे, पूर्वेकडे.. पूर्वेकडून ...ईशान्येकडे, असे करून पाहणे, त्या माझ्या कृतींची अनेकांकडून चेष्टा होत होती. मला वेड्यात काढले जात होते याची मला कल्पनाही होती. परंतु मी वेडेपण करीतच राहिलो. याच प्रयोगांतून मला दिशा मिळाली आणि काही अंशाने मी वास्तूमध्ये वास्तुशास्त्राप्रमाणे बदल करून स्थैर्य साधू शकलो आणि आज साधून आहे. इ्या प्रतिकूल काळात माझा देवावरचा आणि दैवावरचाही विश्वास उडाला होता. अत्यंत तिरस्कार करायचो मी देवाचा आणि दैवाचा. जेव्हा ज्योतिषशास्त्राचे शिक्षण घेतले तेव्हा भाग्य आणि अध्यात्म कळले आणि देव आणि दैव यावर डोळस श्रद्धा जडली. मा विविध शास्त्रांकडे कल झाला आणि शास्त्रोक्त ज्ञानाच्या साधनेतून आणि शास्त्रांच्या जीवनातील उपयोजकतेतून स्थैर्य, समाधान, शांती प्राप्त होत गेले. सांगायचे तात्पर्य हे आहे की, वास्तुशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र यांच्या आधाराने उशिरा का होईना पण मी संपण्याऐवजी स्थिरावलो. म्हणूनच शास्त्रांची उपयोजकता आपल्या जीवनातील स्थैर्याला आधारभूत ठरते हा माझा ठाम स्वानुभव आहे.

सद्यकाळात माणसाच्या ज्ञानाची भरारी आकाशाचा कळस गाठू पाहतेय मात्र ' आकाशाचा कळस ही वास्तविकता आहे का? ' या प्रश्नाचे उत्तर कल्पनातीतच. ज्ञानाची उंची गाठताना नैसर्गिक घडामोडींचे कुतुहल हे माणसाच्या विद्वत्तेला, जिज्ञासेला पदोपदी आव्हानच देत आले आहे. हे आव्हान स्वीकारणाऱ्या अनेकांच्या





वेडाने, वेड लावून घेऊन संशोधनासाठी आयुष्य चंदनासारखे झिजवण्याने, अथांग सागराच्या तळापासून ते अपार अवकाशातील ग्रहताऱ्यांपर्यंत मानवाच्या ज्ञानाची झेप पोहोचली आहे. पहिल्या महायुद्धाने मानवाला स्थैर्यासाठी औद्योगिक क्रांतीकडे वळवले. मानवाची औद्योगिक क्रांतीकडे वाटचाल होत असताना पुरातन शास्त्रे आणि अध्यात्म यांचे मानवावरील संस्कारबंध हे सैल पडत पडत सुटत गेले. दुसऱ्या महायुद्धाने माणसाला आधुनिकीकरणाकडे संमोहित केले आणि मानव आयत्या सुखचैनीसाठी हवे हवे ते करू लागला. आपल्या राहणीमानात, खाण्यापिण्यात चोखंदळ बदल करीत गेला. १) जल, २) अग्नी, ३) वायू, ४) पृथ्वी आणि ५) आकाश या पंचतत्त्वांची जाणीव दुर्लक्षित करून निसर्गावर (पर्यावरणावर) मात करण्याचा कळत नकळत प्रयत्न करीत गेला आणि स्वतः मधील (पिंडीतील) पंचतत्त्वांची आणि देहाबाहेरील (ब्रह्मांडातील) पंचतत्त्वांची सुसंगती साधण्याचे सोडून अनिष्टता साधू लागला. घरांच्या चित्र-विचित्र रचना करू लागला. वास्तु सुशोभित करण्यासाठी त्रिकोणी, चौकोनी, पंचकोनी, षटकोनी ,आडवे, तिरपे, उंच, सखल ...अशी बांधकामांची रचना करू लागला. त्यासाठी अनैसर्गिक कृत्रिम बांधकाम साहित्याचा वापर होऊ लागला. यामुळे बांधलेल्या वास्तूमध्ये वास्तुशास्त्राचा अभाव किंवा दुर्भाव होऊ लागल्याने आपल्या सौख्यासाठी बांधलेल्या अशा वास्तुत तो अतोनात संघर्ष वाट्याला येऊन अपयश, दुःख, नैराश्य हे भोग भोगण्यासाठी स्वतः कारणीभूत ठरत गेला. याची अनेक उदाहरणे मी अनेकांकडे वास्तुशास्त्राचे व्यावसायिक परीक्षण करायला गेलेलो असताना अनुभवली आहेत शिवाय अनेक वास्तूतज्ज्ञांच्या लेखनातूनही माझ्या वाचनात आलेले आहे. वास्तु जर वास्तुशास्त्राचे नियम पाळत नसेल तर ती वास्तु वास्तुत राहणाऱ्यांना दिवसेंदिवस मानसिक ताण, अपयश, नाराजी यांच्या गर्तेत फरफटवत नेते. वास्तूतील दोषांमुळे कित्येकदा दोषी वास्तूंमध्ये कर्त्या व्यक्तींच्या मानसिक असंतुलनामुळे किंवा नैराश्यामुळे आत्महत्याही घडत असतात. वास्तु हे ' शांतीघर ' असावे मात्र सध्याच्या धावपळीच्या जीवनात जर राहत्या वास्तुमध्ये मनःशांती मिळत नसेल तर काय लाभाचे व उपयोगाचे!

पूर्वीच्या काळापासून साधारणतः अलीकडेच १९७५ ते ८० सालापर्यंत आपण घरांना मातीच्या नळ्यांची, कौलांची, गवत-काठ्यांची नैसर्गिक शुंडाकार किंवा सुच्याकार (pyramidic) चौपाकी छप्परे असल्याचे पाहिलेले आहे. मातीच्या किंवा बांबूच्या तटाच्या भिंती आपल्या पाहण्यात आहेत. मातीची

(पान ८ वर )

# नियती नावाची अचाट शक्ती.

(भाग पहिला)

## तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

अपेक्षा एक हसतमुख आणि सदा आनंदी माझी मैत्रीण. तिचं ब्युटीपार्लर विलेपार्ले पूर्वेला आहे. कोरोना काळात भेट नव्हतीच. एकदा वेळ काढून नक्की भेटावं म्हणून फोन केला...मात्र ती हॉस्पिटल मध्ये हे कळलं आणि पायाखालची जमीनच सरकली. तिच्या आयुष्यात झालेली उलथा पालथ ऐकून तर ...!!अक्षरशः अंगावर शहारा आला...दैवाने खूपच मोठी परीक्षा घेतली त्यांची.ती सांगत होती...

"करोनामुळे दोन वर्षे घरातच अडकलेल्या आजी आजोबांना घेऊन त्यांची मुलगी म्हणजे मी. ,जावई आणि नातू दोन दिवस फिरायला स्वतःच्या गाडीने निघालो ग .करोनामुळे बंद पडलेले नेहमीचे उद्योग,त्यातच सुरू केलेला नवीन 'विकेंड किचनचा' व्यवसाय, त्यासाठी चाललेली धडपड ,नातवाची नवीन नोकरी, त्यातील ताण...सगळं सगळं मागे टाकून दोन दिवस रिलॅक्स होण्यासाठी निघालो..दोन दिवस लोणावळ्याला मजा करून परतताना लवासा येथे एक चक्कर मारायला म्हणून जायचं ठरवलं.मस्त हवा होती फ्रेश मूड मध्ये गप्पा, गाणी ऐकणं एकदम पिकनिक मूड.. दोन दिवसांच्या बदलाने संपूर्ण कुटुंबच फ्रेश झालं. आई बाबांना सुद्धा लेक आणि जावई नातवासह एकदम मजा येत होती. खुशीत आणि मजेत प्रवास चालू होता.

खरंतर लवासा (पुण्याजवळील हिल स्टेशन) बंद होते म्हणून नाराज होऊनपरत फिरणार.... पण नियतीच्या मनातलं कोण ओळखणार? म्हणतात ना 'कधीतरी ती वेळ यावी लागते.'दुर्दैवाने तेथील सुरक्षा राक्षकाच्या रूपात आमच्या परीक्षेची वेळ आली. सुरक्षा रक्षक धावत आला आणि शेजारचा डोंगरातील नागमोडी सुंदर रस्ता दाखवून म्हणाला "लवासा बंद आहे पण या रस्त्याने वर



जा वरून सर्व लवासा दिसते."आता इथपर्यंत आलोच आहोत तर चला जाऊया म्हणत गाडी पुढे घेतली. अतिशय सुंदर अशा या वळणावळणाच्या रस्त्यान वरती गेलो. आणि एके ठिकाणी थांबून निसर्गाचा आस्वाद घेतला.स्वच्छ मोकळी हवा आणि निसर्ग सौंदर्य! सगळेच खूप आनंदी होतो..थोडा वेळ थांबून मग गाडीत बसून परतीच्या प्रवासाला लागलो..दोन वळणे पार होतच होती की एका वळणावर...अचानक... गाडीचे स्टिअरिंग लॉक झाले आणि गाडी वेडी वाकडी झाली..ब्रेक ही लागेनात आणि......बघता बघता गाडी दरीत कोसळू लागली.सुंदर वळणावळणाचा रस्ताच शत्रू बनला. गाडी कंट्रोलमधे आणायचा कसोशीने प्रयत्न करणारा असहाय्य जावई- नातू आणि मधे बसलेली आई आपटू नये म्हणून आईला मिठी मारणारी मुलगी मी....कोणालाच न जुमानता गाडी पत्रास फूट दरीत कोसळली.......आणि क्षणात डोळ्यासमोर अंधार पसरला.....

ही कुठल्याही थरारक कथेची सुरुवात नाही तर ६ जुलै २०२१ रोजी आमच्या आयुष्यात घडलेल्या थरारक दुःखद पर्वाची सुरुवात आहे.एक घटना आयुष्यात पूर्ण उलथापालथ घडवून गेली.गाडीत अचानक उद्भवलेल्या तांत्रिक बिघाडामुळे कित्येक आयुष्य बिघडली.दोष कोणाला द्यायचा... याला काय म्हणावे??नियती...प्राक्तन की नशिब ????

खरंतर या सोशल मिडियावर मला पर्सनल शेअर करायला जास्त आवडत नाही कारण इथे जसे जिव्हाळ्याचे लोक आहेत तसेच गैरफायदा घेणारे ही आहेत.पण गेले वर्षभर आमची फॅमिली ज्या दिव्यांमधून पार होते आहे आणि तरीही एकमेकांच्या साथीने उभी राहिली आहे त्यातून कोणाला थोडी जरी उभारी मिळाली तरी माझ्या लिहिण्याचा हेतू सफल झाला असे मी मानेन आणि मी हे लिहावे ही माझ्या वडिलांची इच्छा आहे.

**आज इतकेच...बाकी पुढील भागात...."**

## सोनेरी दुनिया



श्री. श्रीराम शेटये.
नालासोपारा.

### आनंद बक्षी शतकातले सर्वोत्तम कवी

निसर्गसंपन्न काश्मीर सुंदर नदीकिनारा. वेड लावणारा निसर्ग पाहून मन मोहरून जाते. काय चित्रपट बनविले जायचे त्या काळात. लोकेशन ,गाणी, कलाकार सगळेच स्वर्गीय वाटावे एवढे लाजवाब .देखणा ऐन उमेदीत असलेला शशी कपूर तरफ्यावर बसला आहे परदेशी पर्यटकांच्या प्रतिक्षेत. त्याची हाऊसबोट आधीच बुक झालेली आहे. परंतु ज्यांनी बुक केलेली ते आलेलेच नाहीत. तेवढ्यात काश्मीर पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी आलेली अल्लड तरूणी समोर येते. नंदा अमेरीकेतून शिक्षण घेऊन भारतात आलेली तरूणी दाखविली आहे. एवढ्या हाऊस बोटीतून तिला शशी कपुरचीच बोट आवडते. शशी कपूर तिला संपुर्ण कश्मीर फिरवतो. कश्मीर फिरवता फिरवता दोघे एकमेकांच्या प्रेमात कधी पडतात ते त्यांनाच कळत नाही.

असा हा सुंदर सीन होता 'जब जब फुल खिले' या चित्रपटाचा. आनंद बक्षी यांची अर्थपूर्ण गीते आणि कल्याणजी आनंदजी यांचे मन लुभावणारे संगीत यांनी  हा चित्रपट नटलेला आहे. 'परदेशीयोंसे ना अखिया मिलाना ' हे गाण महमद रफिने जीव ओतून गायल आहे. कल्याणजी आनंदजी यांच्या अप्रतिम संगीताने नटलेले हे गाणे. काश्मिरच्या नयनमनोहर निसर्गाच्या सानिध्यात चित्रित करण्यात आले आहे.

**' परदेशीयोंसे ना अखिया मिलाना परदेसीयोंको है एकदिन जाना'**

किंवा 'एक था गुल और एक थी बुलबुल' ही विरहगीते अजरामर झाली आहेत. त्या काळात हा चित्रपट सुपरहीट तर झालाच होता. आनंद बक्षी यांची गीते चाहत्यांच्या हृदयात रूंजी घालत होती.

"जब जब फुल खिले ' हिट झाल्यानंतर या चित्रपटातील कलाकारांचा सत्कार करण्यासाठी एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून दिलिप कुमार यांना बोलविण्यात आले होते. सत्काराच्या वेळी सर्वांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. परंतू शेवटच्या खुर्चीवर असलेल्या आनंद बक्षी यांना द्यायला पुष्पगुच्छ कमी पडला. तेव्हा दिलिप कुमार त्यांना म्हणाले, "तुम्ही आनंद बक्षी ना? मग तुम्हाला पुष्पगुच्छ का देण्यात आला नाही?" मग दिलिप कुमार यांनी आपल्याला मिळालेला पुष्पगुच्छ त्यांना दिला. आनंद बक्षी आणि दिलिप कुमार यांचा स्नेहबंध या घटनेनंतर कायमचा राहिला .

' जब जब फुल खिले' नंतर आनंद  बक्षी यांची अनेक सुपरहीट गाणी आली. 'हिमालय की गोद मे' या चित्रपटातील 'चांद सी मेहबूबा हो मेरी ' या गाण्याने प्रसिध्दीचे सर्व रेकॉर्डस तोडले होते. आराधना मधिल 'मेरे सपनोकी राणी कभी आयेगी तू"  हे गाणे आजही चाहत्यांची हृदये लुभावत आहे. या एका गाण्याने किशोर कुमार शिखरावर पोहचले आणि राजेश खन्नाच्या डोक्यावर सुपरस्टार चा ताज चढला. एस. डी. बर्मनच संगीत निर्देशन होते खरे, पण हे गाणे त्यांचा मुलगा आर. डी. बर्मनच निर्देशित करीत होता. एस. डी. तेव्हां आजारी होते. या गाण्याने आर डी बर्मनच नशीब काढल. 'मिलन ' चित्रपटातील 'सावन का महिना पवन करे शोर' हे आणखीन एक अप्रतिम गाणे.

आनंद बक्षी यांनी आपल्या कारकिर्दीत सुमारे सहाशे चित्रपटांना चार हजार गाणी दिली. ईतकी सुंदर गाणी हिंदी भाषेत लिहिणारे ते एकमेव कवी आहेत. त्या काळात उर्दू शायरांचा चित्रपट जगतावर पगडा होता. भगवान दादांच्या 'भला आदमी' या चित्रपटात आनंद बक्षी यांना प्रथम संधी मिळाली.

आनंद बक्षी आणि लक्ष्मीकांत प्यारेलाल हे जनू समिकरण जूळले होते. आनंद बक्षी यांची जास्तित जास्त गाणी लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी निर्देशित केली आहेच. ' आया सावन झुमके', 'आन मिलो सजना' ,'प्रेम कहाणी', ' अमर अकबर अंथोनी' ,'मिलन' ,'कटी पतंग', 'जुली' , 'आखरी रास्ता', 'कर्मा', 'नाम' ,'शहंशाह' , 'राम लखन', 'त्रिदेव', 'सौदागर', 'मोहरा', आणि 'मेरी बिवी का जवाब नही' हा मृत्युच्या वर्षी गाणि लिहिलेला अगदि शेवटचा चित्रपट.

आनंद बक्षी आयुष्यभर लिहित राहिले. शाळकरी वयातच मी त्यांच्या कवीता आवर्जून वाचत असे. मला आठवते प्रत्येक वर्षी हिंदिच्या पाठ्यक्रमात त्यांची एक तरी कवीता असायची. सर्वात आधी मी ती वाचायचो.

आनंद बक्षी शेवटच्या काळात खुप आजारी होते. अंथरूणाला  खिळले होते. तेंव्हा  दिलिप कुमार त्यांना भेटायला घरी गेले होते. दिलिप कुमार यांना पाहून आनंद बक्षी यांचे हृदय उचंबळून आले. ते दिलिप कुमार यांना काहितरी महत्वाचे सांगायला बघत होते. ते उठण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्यांना खुप प्रयत्न करूनही उठता येईना. त्यांचा तो केविलवाणा प्रयत्न पाहून दिलिप कुमार म्हणाले तुम्ही उठू नका मी तुमच्याकडे येतो. दिलिप कुमार बेडवर अक्षरक्षः आनंद बक्षी यांच्या बाजुला झोपले व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले.



## गुरुविण जगीं थोर काय...?

प्रा.के.एस.शिरबंदे,
दापोली.

**गुरुविण कोण दाखवील वाट**
**आयुष्याचा पथ हा दुर्गम**
**अवघड डोंगर घाट,**
**अवघड डोंगर घाट...**
**गुरुविण कोण दाखवील वाट..?**

**दिशा न कळली, या अंधारी**
**नसे आसरा, नसे शिदोरी**
**कंठ दाटला आले भरुनी,**
**लोचन काठोकाठ...**
**गुरुविण कोण दाखवील वाट...?**

"गुरुविण कोण दाखवील वाट..?"  हा मायारूपी भव सागर तरुन जायचे असेल तर सद्गुरूंची आवश्यकता आहे. सद्गुरुच मोक्षप्रत नेतात. एकदा त्यांनी आपला हात हातात घेतला की ते आपल्याला सोडत नाहीत. सद्गुरुना शोधण्यासाठी आपणास जावे लागते असे नाही, तर शिष्याची अध्यात्मिक तयारी झाली की ते स्वतःहून त्याला शोधत येतात...!

आपल्या देशात रामायण, महाभारत काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे. आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, मिळवतो, त्याच विद्येच्या बळावर आपण सर्वांचा उद्धार करीत असतो. अशा या गुरुनां मान देणे, आदराने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. महर्षी व्यासापासून अशी ही प्रथा रूढ झाली,ती आजपर्यंत चालू आहे..!

खरं गुरुपूजन, खरी गुरुपूजा म्हणजे ज्यांनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे, जो बोध केला आहे, जी शिकवण दिली आहे,  त्याचे प्रत्यक्ष आचरण करणे होय. सद्गुरुनी दाखवून दिलेल्या साधना मार्गाचा अभ्यास करणे, त्यांचा शब्द चालवणे म्हणजे खरे गुरुपूजन..!

गुरुच्या उपकारानी आपले मन जेव्हा कृतज्ञतेने भरून येते, तेव्हा आपल्या तोंडून खालील श्लोक बाहेर पडतो...!

**गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु ,**
**गुरुर्देवो महेश्वर,**
**गुरु साक्षात परब्रम्ह,**
**तस्मै श्री गुरुवे नमः !**

वरील श्लोक हा आदी  शंकराचार्यांचे आध्यात्मिक मार्गदर्शक,गोविंदा भगवदपाद यांनी सांगितला आहे. हा श्लोक  आपल्याला गुरुचे महात्म्य किती आहे हे सांगून जातो...! "गुरु" हे त्रिमूर्ती भगवान ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे अवतार आहेत. जे ज्ञान निर्माण करतात, टिकवून ठेवतात आणि अज्ञान दूर करतात..!

"गुरु हा निर्माता ब्रह्म आहे". म्हणजेच गुरु हा ब्रह्म देवासारखा निर्माता आहे, जो जीवनातील तथ्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी ज्ञानाची उत्पत्ती करत "गुरु हा विष्णू सारखा रक्षक आहे"- म्हणजेच गुरु हा भगवान विष्णू सारखा संरक्षक आहे, जो सृष्टीला टिकवून ठेवण्यासाठी मदत करतो...!

"गुरु हा महादेव (महेश्वर) सारखा सहारक आहे". जो अज्ञानाचा नाश करणारा आणि मनातील अज्ञान दूर करण्यास मदत करतो

**"गुरु साक्षात परब्रम्ह" -**

गुरु म्हणजे साक्षात परब्रम्ह आहे, परब्रम्ह म्हणजे सर्वोच्च देवता किंवा सर्वशक्तिमान परमेश्वर..! गुरु हा प्रकाशाच्या मार्गाने नेणारा असल्याने, गुरु हा परब्रह्म आहे किंवा सर्वोच्च देवता आहे...! "तस्मै श्री गुरवे नमः" याचा अर्थ आपण वर उल्लेखलेल्या, गुरुनां नमन किंवा प्रणाम करूया असा आहे...! अशाप्रकारे एक साक्षात्कारी आत्मा म्हणून, गुरु हे परब्रम्हाचे,परम (सर्वोच्च) ईश्वराचे अवतार आहेत...!  गुरु हा स्वतःमध्ये परमेश्वर आहे, आणि जगातल्या सर्व प्रकारचा अंधकार दूर करणाऱ्या या परमेश्वराला, त्या परब्रम्हाला माझे कोटी कोटी नमन...!

मित्रांनो..! मी आशा करतो की,  गुरुविण जगीं थोर काय..? या प्रश्नाचे उत्तर माझ्या या लेखातून आपल्याला नक्कीच मिळाले असेल...! या लेखाला पूर्णविराम देताना, मी असे म्हणतो की...

**ना वयाचे बंधन**
**ना नात्याचे जोड,**
**ज्याला आहे अगाध ज्ञान**
**जो देई हा निस्वार्थ दान,**
**"गुरु" त्यासी मानावा**
**देव तेथेची जाणावा..!**

# सरकारी योजना/नोकरी

## जलजीवन मिशन योजना

जलजीवन मिशन (Jal Jeevan Mission) ही भारत सरकारची एक महत्वाकांक्षी योजना आहे, ज्याचा उद्देश ग्रामीण भागातील प्रत्येक घराला नळाद्वारे सुरक्षित आणि स्वच्छ पाणी पुरविणे आहे. या योजनेद्वारे पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेची समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्रात ही योजना प्रभावीपणे राबविली जात आहे आणि हजारो ग्रामीण कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळत आहे.

**जलजीवन मिशन म्हणजे काय?**

जलजीवन मिशन ही योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने १५ ऑगस्ट २०१९ रोजी सुरू केली. या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी पुरविणे आहे. या योजनेद्वारे पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, स्वच्छता, आणि आरोग्याच्या दृष्टीने सुधारणा करण्याचा उद्देश आहे.

**जलजीवन मिशनची वैशिष्ट्ये:**

1. **सर्व घरांना नळ कनेक्शन:** या योजनेद्वारे ग्रामीण भागातील प्रत्येक घरात नळ कनेक्शन पुरविले जाते.
2. **सुरक्षित आणि स्वच्छ पाणी:** या योजनेद्वारे पुरविल्या जाणाऱ्या पाण्याचे गुणवत्तेवर लक्ष दिले जाते.
3. **समुदाय सहभाग:** या योजनेत ग्रामीण भागातील लोकांना सहभाग घेण्यास प्रोत्साहित केले जाते.
4. **स्थायी पाणी व्यवस्थापन:** जलस्रोतांचे स्थायी व्यवस्थापन करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतात.
5. **स्वच्छता आणि आरोग्य:** पाण्याच्या गुणवत्तेमुळे आरोग्यावर होणाऱ्या परिणामांना कमी करण्यासाठी या योजनेचे योगदान आहे.

**जलजीवन मिशनसाठी अर्ज कसा करावा?**

1. **स्थानीय ग्रामपंचायत कार्यालय:** आपल्या गावातील ग्रामपंचायत कार्यालयात जा.
2. **अर्ज फॉर्म मिळवा**: जलजीवन मिशन अंतर्गत नळ कनेक्शनसाठी अर्ज फॉर्म मिळवा.
3. **अर्ज भरा:** अर्ज फॉर्ममध्ये आवश्यक माहिती भरा. यात तुमचे नाव, पत्ता, आधार क्रमांक, आणि इतर आवश्यक माहिती समाविष्ट असते.
4. **दस्तऐवज संलग्न करा:** आवश्यक दस्तऐवज संलग्न करा. यामध्ये आधार कार्ड, पत्त्याचा पुरावा, आणि इतर आवश्यक दस्तऐवजांचा समावेश असतो.
5. **अर्ज सादर करा:** पूर्ण केलेला अर्ज आणि संलग्न दस्तऐवज ग्रामपंचायत कार्यालयात सादर करा.
6. **फी भरा**: काही प्रकरणांमध्ये अर्ज सादर करताना काही शुल्क आकारले जाते. हे शुल्क भरणे आवश्यक आहे.
7. **तपासणी आणि मान्यता:** अर्जाची तपासणी झाल्यानंतर त्याला मान्यता दिली जाते.
8. **नळ कनेक्शन:** मंजुरी मिळाल्यानंतर आपल्या घरी नळ कनेक्शन दिले जाते.

**जलजीवन मिशनच्या लाभांचा उपयोग कसा करावा?**

1. **पाणी साठवण:** पुरविल्या जाणाऱ्या पाण्याचे योग्य साठवण करा.
2. **पाण्याचे पुनर्वापर:** पाण्याचे पुनर्वापर करण्याचे तंत्र जाणून घ्या आणि त्याचा उपयोग करा.
3. **स्वच्छता राखा:** नळाद्वारे पुरविल्या जाणाऱ्या पाण्याची स्वच्छता राखण्यासाठी आवश्यक ती काळजी घ्या.
4. **समुदाय सहभाग:** आपल्या गावातील जलजीवन मिशनच्या योजनांमध्ये सहभागी व्हा आणि इतरांना सहभागी होण्यास प्रोत्साहित करा.
5. **जागरूकता निर्माण करा:** पाण्याच्या महत्वाची जागरूकता निर्माण करा आणि जलसंपत्तीचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करा.

**निष्कर्ष**

जलजीवन मिशन ही योजना महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील लोकांसाठी वरदान ठरली आहे. या योजनेद्वारे नळाद्वारे सुरक्षित आणि स्वच्छ पाणी पुरविल्यामुळे लोकांचे आरोग्य सुधारत आहे आणि त्यांचे जीवनमान उंचावत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात संपर्क साधा आणि आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करा. जलजीवन मिशनच्या माध्यमातून आपण पाण्याच्या समस्येचे समाधान करू शकतो आणि आपल्या गावाचा विकास साधू शकतो.

## महिला सशक्तीकरण योजना

महिला सशक्तीकरण योजना म्हणजे महिलांना त्यांच्या जीवनातील विविध क्षेत्रांत सशक्त बनविण्यासाठी सरकारतर्फे चालविण्यात येणारी योजना. या योजनांचा उद्देश महिलांना आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, आणि राजकीय क्षेत्रांत प्रगती करण्यासाठी सहाय्य करणे आहे. महाराष्ट्र राज्य सरकारने महिलांच्या सशक्तीकरणासाठी विविध योजना सुरु केल्या आहेत ज्यामुळे महिलांना स्वावलंबी होण्याची संधी मिळते.

**महिला सशक्तीकरण योजनेचे मुख्य उद्देश:**

1. आर्थिक सशक्तीकरण: महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी विविध आर्थिक सहाय्य योजना.
2. शैक्षणिक सशक्तीकरण: महिलांना उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक सहाय्य.
3. सामाजिक सशक्तीकरण: समाजातील महिलांना विविध क्षेत्रांत सन्मानाने वागविण्यासाठी सामाजिक कार्यक्रम.
4. राजकीय सशक्तीकरण: महिलांना राजकीय क्षेत्रात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन.

**महाराष्ट्रातील काही प्रमुख महिला सशक्तीकरण योजना:**

**१. उज्ज्वला योजना**

उज्ज्वला योजना ही केंद्र सरकारची योजना आहे, परंतु महाराष्ट्र सरकार देखील या योजनेत योगदान देते. या योजनेअंतर्गत गरीब कुटुंबातील महिलांना मोफत एलपीजी गॅस कनेक्शन दिले जाते, ज्यामुळे त्यांच्या आरोग्याचे संरक्षण होते आणि त्यांना स्वच्छ इंधन उपलब्ध होते.

**२. स्त्री शक्ती योजना**

स्त्री शक्ती योजना ही महाराष्ट्र सरकारची एक प्रमुख योजना आहे. या योजनेतर्गत महिलांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. महिला बचत गटांना विविध उद्योग सुरू करण्यासाठी मदत केली जाते आणि त्यांना तांत्रिक प्रशिक्षण दिले जाते.

**३. सक्षम महिला योजना**

सक्षम महिला योजना ही महिलांच्या सशक्तीकरणासाठीची एक विशेष योजना आहे. या योजनेतर्गत महिलांना विविध व्यवसाय आणि उद्योगातील तांत्रिक आणि व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. तसेच, त्यांना उद्योग सुरू करण्यासाठी कर्जसहाय्य दिले जाते.

४. **बेटी बचाओ बेटी पढाओ योजना**

बेटी बचाओ बेटी पढाओ योजना ही केंद्र सरकारची योजना आहे, जी महाराष्ट्रातही राबवली जाते. या योजनेतर्गत मुलींच्या शिक्षणासाठी आणि आरोग्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. मुलींच्या जन्म दर वाढविण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणाची सुविधा वाढविण्यासाठी या योजनेचे उद्दिष्ट आहे.

५. **महिला अटल फेलोशिप योजना**

महिला अटल फेलोशिप योजना ही महाराष्ट्र सरकारची योजना आहे. या योजनेतर्गत महिलांना संशोधन आणि नवप्रवर्तन क्षेत्रात प्रोत्साहन दिले जाते. महिलांना उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते आणि त्यांना संशोधनात योगदान देण्याची संधी दिली जाते.

**महिला सशक्तीकरण योजनेअंतर्गत अर्ज कसा करावा?**

१. **अर्ज फॉर्म मिळवा**

- संबंधित योजनेच्या कार्यालयात जा किंवा योजना कार्यालयाच्या अधिकृत वेबसाइटवर जा.
- योजनेचा अर्ज फॉर्म मिळवा.

२. **अर्ज फॉर्म भरा**

- अर्ज फॉर्ममध्ये आवश्यक माहिती भरा. उदाहरणार्थ, आपले नाव, पत्ता, आधार क्रमांक, आणि अन्य आवश्यक माहिती.
- संपूर्ण आणि योग्य माहिती भरणे अत्यंत महत्वाचे आहे.

३. **आवश्यक दस्तऐवज संलग्न करा**

- अर्ज फॉर्मसह आवश्यक दस्तऐवज संलग्न करा. यामध्ये आधार कार्ड, पत्त्याचा पुरावा, उत्पन्नाचा पुरावा, आणि अन्य आवश्यक दस्तऐवजांचा समावेश असतो.
- काही योजनांमध्ये वैयक्तिक बँक खाते क्रमांक आणि पासबुकची प्रत देखील आवश्यक असते.

४. **अर्ज सादर करा**

- पूर्ण केलेला अर्ज आणि संलग्न दस्तऐवज संबंधित योजना कार्यालयात सादर करा.
- अर्ज सादर करताना कोणतेही शुल्क असले तर ते भरा.

५. **अर्जाची तपासणी आणि मान्यता**

- अर्जाची तपासणी झाल्यानंतर त्याला मान्यता दिली जाते.
- मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित योजना अंतर्गत लाभ दिला जातो.

६. **लाभाचा उपयोग करा**

- मंजुरी मिळाल्यानंतर आपण योजनेअंतर्गत मिळणारा लाभ आपल्या गरजेनुसार वापरू शकता.
- आर्थिक सहाय्य, शिष्यवृत्ती, किंवा तांत्रिक प्रशिक्षण यासारख्या लाभांचा उपयोग करावा.

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक- विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

# लायट नसताना....

## गजाल

**रीना पास्ते परब**
**पुणे**

पावस डोळे ढाकुन वत्ताहा... लायट जावन आज चार दिस जाले... काय करू हुनान सोनल्यान सगळा कपाट रिक्यामी केल्यान. इरड लावन सोयन कपाट लायल्यान. घडी घालून सगळे कपडे यवस्तीत लावन त्याना कपाट बगला. त्याकाच बगून भारी वाटला. येळ घालवक हुनान ता ह्या करी होता. आवस बापुस शेतकरी त्यांका आतासो थारो नसता. सोनला हेरशी जवान करून मोबायलार बसान रवा. आता पावसानं लायटीर शिरा मारल्यान नि सोनल्याक काय करू ता कळाना. सोनला यवन भायर बसला. बगता तर परत पावस भरान इलो. शाप आनारलो, आज दुकू लायटीचा यवचा चिन्ह नाय... सोनला वैतागत नखा खायत धक्यार बसान होता. तितक्यात सोनल्याचो बापुस ख्वाळ घेवन इलो. "सोनल्या चाय करून थर्मासात भर बगया... तुज्या आवशीक यवक येळ नाय हा... सात पेले तरी जावं व्हये हा... आला घाल वायच..." घरात पाय ठेवच्या आदी सोनल्याच्या बापाशीन सोनल्याक काम लायला. सोनला आदीच लायट नाय हुनान धुसपूस करी होता. तेतूर काम हुनजे जाला त्याचा. हा करतय हुनत ता घरात गेला. चायचा आदान ठेवन आला धुवन गुण्यान ठेचून ता चायत घालून चाय उकाळता काय ता बगी होता. पाटसुन बापुस इलो. "साकार पावडर घाल मगो, जावचा आसा माका..." बापाशीन सांगल्यार त्याना पटकन चायत सगळा घातला. बरी उकाळली तशी थर्मासात वतून त्याना थर्मास नि पेले पिश्येत घातले. पिशी हातीत घेवन ख्वाळ घालीत बापाशीन ईचारला "काय गो गप कित्या तिया... लायटीचो भरवासो आज दुकू नाय हा. तडे लोका हुनतत मोठा काय तरी जाला येळ लागतलो. पावस थांबलो तर काम करतले..." बापाशीक कळला सोनला घरात कंटाळला ता. हुनान तो त्याका सांगा होता लायटीची वाट बगू नको... सोनला आयकान घेवन गप बसला. "अगो आमी न्हान आसताना, लायटी नाय होते, मोबायल नाय होते, आमी कशे रवलव, आता तुमका लायटीशिवाय चार दिस जड जाले ते... काय तरी कर मगो... वाचन कर, नाय तर काय तरी करून खा जा... चुलीत घोट्ये भाज, काजी भाजून खा... कागदाचे होडये कर... झोपाळ्यार बसान पावसाची गाणी हुन, कविता लिहून काढ... खूप काय काय करूक आसा..." सोनल्याच्या बापाशीन चलता चलता खूप काय सुचायला... बापुस गेलो तरी सोनला ईचारात बसला. उठान जावन त्याना घोट्ये भाजले. चुलीतल्या घोटयांचो वास घेवन त्याका बरा वाटला. घोट्ये सुपात घेवन ता भायर इला. झोपाळ्यार बसान घोट्ये सोलीत त्याना गाणी हुनाक सुरू केली. पाठ असलंली नसलंली गाणी ता हुना होता. घोट्ये खावन जाले तशे उठान नाचाक लागला. भायर पावस पडा होतो हडे सोनला गावन गावन नाचा होता. आज त्याका खूप भारी वाटला. मोबायल घेवन मजा यना नाय तितकी मजा त्याका वाटा होती. घड्याळात बगल्यान तर दोन वाजले. आवस बापुस जवक यतली हुनान त्याना पटकन चुलीकडे जावन भजी भाजूक घेतली. भज्याचो वास भायरतग्यात इलो. थण पावसाची चुलीकडे बसान गरम गरम भजी खायत खायत सोनला गाणी हुना होता तितक्यात आवस घरात इली. भज्याच्या वासानच तिका बरा वाटला. "भूक चाळावली गो सोनल्या..." बापुस चुलीकडे यवन हुनाक लागलो. सोनला जवची तयारी करूक लागला. आवशीन भात सामारा करूनच ठेयलला. सगळी जवक बसली. बापुस सोनल्याक हुनाक लागलो. भजी भारी जाली. सोनला खुश जाला. बापाशीन सांगल्यापरमाणे आज त्याना मोबायल नसताना खूप मजा केली...











# पावसाचो हुदुदो!

## मालवणी मुलखात



**वयल्यांचा कवग्या,**
**मालवण- सिंधुदुर्ग.**

आता पाच सा दिस होतीत. पाव्स बाय थांबाचा नाव नाय घेना. रात नकळा, दिस नकळा पावसाक बाय खळतीच नाय. यंदा तर त्या लायटीवाल्यांनी लय नाकीनव आनल्यानीहत. वायच पावसाचो जोर वाढलो, जोराचो वारो सुटलो, गेली लायट. परवाच कोणीतरी स्टेटस टाकल्यान, दिवसभरात तीनशे पासष्ट वेळा लायट जाय्त असलेल्या गावांची यादी करतय. तुमच्या गावाचा नाव ॲड करू काय? मी बाय लगेच नाव देवून टाकलय, घेवा नाव! काय करशीत तरी काय? खरा सांगाचा तर गेलो म्हयनोभर नुसती लायट जाता, येता. भीती वाटता, ह्या लायटीच्या नाचात घरातले टीव्ही, फ्रीज वॉशिंग मशिनी बिघडान फुकट जातीत तर! परवा सहज लायटीवाल्यांक म्हटला फोन लावन तरी विचारूया, लायटीर शीरा तरी कशान पडली म्हनाचा. ह्येंनी लावल्यानी फोन लायटीवाल्यांक. तकडसून उत्तर इला, लायनीवरची झाडी तोडतंव. ता आटापला की काय तो फॉल्ट गावात. फॉल्ट गावलो की येयत लायट. ह्या पावसाच्या हुदुद्यात आता लायनीवरची झाडी तोडतत. काय बोलणार काय ताच कळना नाय. माझी सासुबाय असा काय दिसला की सांगायची, ' गीम गेलो रेटारेटीत नि....!' गीमात ह्वले आराम करीत नि आता त्येंका सुचला, झाडी वाढल्यामुळा लायनी व्यवस्थित चलनत नायत. आता कपाळ फोडून घेवची वेळ इलीहा.

धड लायट नाय, आता गेले चार दिस लायट नाय आमच्याकडे. कशी कामा करनार सांगा बघू. चटणीचा वाटान नाय की सकाळी गिझर लागना नाय. काय सुचना नाय! परवापासून तर पाव्स ह्यो वतताहा. थांबाचा नाव नाय. पोराटोरांक शाळेत धाडूक भय वाटता. कधी मोरयेत पाणी भरात, कधी झाड रस्त्यावर पडात, कधी काय होय्त सांगान येता? परवा पोरग्या छत्री देवक म्हनान शाळेत गेलंय तर ह्यो पावसाचो हुदुदो! शाळेचा छप्पर पत्र्यांचा. शाळेच्या मैदानात ढोपारभर पानी तुंबलला. व्हरांड्यात पाय ठेवक जागो नाय. शाळेत लायटीचो पत्तो नाय. वर्गात वाकान बघलय तर आंधार घुडूप! पोरांक सर दिसनत नाय, सरांक पोरा दिसनत नाय. पोरांक पोरा दिसनत नाय. अशा हुदुद्यात पोरा तरी कशी शिकतली नि बिचारे सर तरी काय ओ करतले? वर्गात पाऊल टाकतंय तर कान भेरे होवची पाळी. पावसाचे धारे टपाटप पडान पत्र्यांचो इतको मोठो आवाज की काय बोलतलास! कान फुटाची पाळी. ह्यो असोच पाव्स सुरु ह्वलो तर पोरांचा शिक्षण कठीन हा बाबा! सरांक रिक्वेस्ट करून मिनुक घराक घेवन इलय. मिनुक घरात सोडून म्हटला वायच जळवीन काय करता बघून येवया. जळवीनीकडे जातना बघतय तर आमच्या शेजारच्या दोशी डॉक्टरांचो गडगो भुईसपाट! गडगो कोसाळलो तो कोसाळलो, पण डॉक्टरांचे दोनय टू व्हिलर त्या पडलल्या धोंड्यांखाली नि मातयेच्या ढीगाऱ्याखाली. दोनय गाडयेंचा बराच नुकसान झालाहा. त्यातल्या त्यात एक गाडी कशीबशी डॉक्टरानी भायर काढल्यानी. पण



दुसरी गाडी काढ्क जमन्यासारखी नाय. ह्या पावसान लय लोकांचा असा वाटोळा केल्यानहा. अजूनय करताहा. कोन कोन म्हंतत, झाडा पेडा तोडलास, राना उजाड केलात, पावसाक भायरो केलास! त्येंका म्हनाचा, घेवा आता कितको तो पाव्स. ओ, ह्या पावसान गेल्या आठ दिसांपासून कोकण रेल्वे बंद पाडल्यान, मुंबैचा तळामळा केल्यान. कधी कोनी विचारय नाय केल्यान असात, पण पुण्यासारख्या शहर बुडवल्यान. मुंबई गोवा मार्गाची लक्तरां वेशीवर टांगल्यान. आता बोला! आता ह्या पावसाच्या हुदुद्यात शाळेतल्या पोरांचे हाल नको म्हनान आज कलेक्टर सायबांनी सगळ्या शाळांक सुट्टी जाहीर केल्यानीहा. पण काय चमत्कार बघा, रात्री सुट्टी जाहीर झाली नि आज सकाळपासून पाव्स नायसो झालोहा! आता अशा पावसाच्या हुदुद्याक थांबवचो तर शाळांक सुट्टी जाहीर करना ह्योच सध्याचो तरी रामबान उपाय दिसताहा! आता काय बोलशात?



# "कुकीज रेसिपी "



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**कुकीज हा एक लोकप्रिय आणि चविष्ट स्नॅक आहे जो लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच आवडतो. घरी बनविलेल्या कुकीजमध्ये ताजेपणा आणि स्वाद अधिक असतो. चला तर मग, आपण एक साधी आणि चविष्ट कुकीजची रेसिपी पाहूयात.**

**साहित्य:**

- **मैदा: २ कप**
- **बेकिंग पावडर: १ चमचा**
- **बेकिंग सोडा: १/२ चमचा**
- **मीठ: १/४ चमचा**
- **लोणी (बटर): १ कप (सॉफ्ट)**
- **ब्राऊन शुगर: १ कप**
- **साधी शुगर: १/२ कप**
- **अंडं: २**
- **व्हॅनिला इसेन्स: २ चमचे**
- **चॉकलेट चिप्स: २ कप (ऐच्छिक)**
- **सुकामेवा (नट्स): १/२ कप (ऐच्छिक)**

**कृती:**

**ओव्हनची तयारी:**

- ओव्हन ३५०°F (१७५°C) वर प्रीहीट करा.

**२. सुक्या साहित्याची तयारी:**

- एका मोठ्या बाऊलमध्ये मैदा, बेकिंग पावडर, बेकिंग सोडा आणि मीठ चाळून घ्या. हे मिश्रण बाजूला ठेवा.

**३. लोणी आणि साखर फेटणे:**

- एका मिक्सिंग बाऊलमध्ये लोणी, ब्राऊन शुगर आणि साधी शुगर एकत्र करा.
- हे मिश्रण मिक्सरच्या सहाय्याने चांगले फेटा जोपर्यंत ते हलके आणि फुलके होत नाही.

**४. अंडी आणि व्हॅनिला इसेन्स:**

- फेटलेल्या लोणीत एकेक अंडं घाला आणि चांगले फेटा.
- व्हॅनिला इसेन्स घाला आणि मिश्रण एकजीव होईपर्यंत फेटा.

**५. सुक्या साहित्याचे मिश्रण:**

- आता चाळलेले सुक्या साहित्याचे मिश्रण थोडं थोडं करून ओले मिश्रणात घाला आणि हलक्या हाताने मिसळा.
- चॉकलेट चिप्स आणि सुकामेवा घालून एकजीव करा.

**६. कुकीजचे गोळे तयार करणे:**

- बेकिंग शीटवर बटर पेपर ठेवा किंवा थोडं लोणी लावा.
- तयार मिश्रणाचे छोटे छोटे गोळे तयार करून बेकिंग शीटवर ठेवा. प्रत्येक गोळ्याच्या मध्ये अंतर ठेवा कारण बेकिंग दरम्यान कुकीज फुलतात.

**७. बेकिंग प्रक्रिया:**

- कुकीजला प्रीहीटेड ओव्हनमध्ये ठेवा आणि १०-१२ मिनिटे किंवा कुकीजच्या कडा सोनेरी रंगाच्या होईपर्यंत बेक करा.
- बेक झाल्यावर कुकीजला ओव्हनमधून बाहेर काढा आणि काही मिनिटे थंड होऊ द्या.

**८. सर्व्हिंग:**

- गरमागरम कुकीज सर्व्ह करा किंवा पूर्णपणे थंड झाल्यावर हवाबंद डब्यात ठेवून साठवून ठेवा.

**टीप:**

- तुम्ही चॉकलेट चिप्स ऐवजी ड्राय फ्रूट्स किंवा कॅन्ड फ्रूट्स घालू शकता.
- कुकीजचे मिश्रण बनवताना फार जास्त फेटू नका, अन्यथा कुकीज हार्ड होऊ शकतात.

# डावी व उजवी विचारसरणी म्हणजे काय ?

अशोक राणे ,
अकोला
९४२३६५८३८५

भारताच्या सर्वच प्रकारच्या प्रसारमाध्यम आणि समाज प्रबोधन करणाऱ्या संस्था मध्ये नेहमीच डावी व उजवी वैचारिक विचारसरणी असा शब्दप्रयोग वापरला जात असून डावे-उजवे वाक्य परवलीचे वाक्य ठरली आहेत देशातील सर्व प्रकारच्या प्रसार माध्यमांच्या बातमी पत्रा मध्ये सुध्दा उल्लेख होत असतो. तसेच देशातील राजकीय पक्ष व सामाजिक संघटना,संस्थांची डावे-उजवे वर्गीकरण सुद्धा करून ठेवल आहे. कॉंग्रेस, कम्युनिस्ट पक्ष आणि ईतर काही पुरोगामी पक्ष आणि संघटना डाव्या विचारसरणी मध्ये तर भारतीय जनसंघ, भारतीय जनता पक्ष,शिवसेना राजकीय पक्ष तथा राष्ट्रीय स्वंयसेवक संघ, हिंदू महासभा विश्व हिंदू परिषद इत्यादी सामाजिक संघटना उजव्या विचारसरणी मध्ये वर्गीकरण करण्यात येते. त्यामुळे डावी आणि उजवी विचारसरणी म्हणजे नेमक काय असा प्रश्न सर्व सामान्य माणसाला नेहमी पडत असतो. वास्तविक पाहता आपल्या देशात डावी उजवी विचारसरणी हे शब्द प्रयोग भारतीय नाहीत युरोपीय देशां मधुन ही आलेली कल्पना आहे. तसेच सर्वसाधारणपणे फ्रान्स मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांती नंतर भारतात आणि युरोपीय देशात राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनाचे "डावे -उजवे" वर्गीकरण करणारे शब्दप्रयोग मोठ्या प्रमाणात प्रचलित केल्या गेले आहेत युरोप देशा मध्ये राजेशाही व सरंमजामशाही यांची एकहाती सत्ता होत्या. सोबतच त्या सत्ता अन्यायकारक सत्ता होत्या.

फ्रेंच मध्ये सुद्धा राजेशाहीची अनियंत्रित सत्ता होती व सम्राट सोळाव्या लुई च्या काळात फ्रेंच परिस्थिती बिकट झाली होती आर्थिक रचना सुध्दा बिघडली होती मूळ अन्न असलेला ब्रेड महाग झाले होते जनतेने ब्रेड महाग झाल्या मुळे राजसत्तेला दाद मागितली असता "ब्रेड महाग झाल्यास केक खां" असे उत्तर मिळाले त्यामुळे फ्रेंच जनता रस्त्यावर आली आणि दि १४ जुलै १७८९ रोजी फ्रेंच राज्यक्रांतीला सुरूवात झाली वर्ष १७८९ ते १७९९ या प्रदीर्घ काळात राज्यक्रांती झाली जॉ जॉकवेस रुसो यांना फ्रेंच राज्यक्रांतीचे जनक म्हणतात. फ्रेंच राज्यक्रांती मध्ये तेथे दोन गट पडले राजेशाही व सरंमजामशाही यांच्या एकहाती सत्तेला विरोध करणारा एक गट तर राजेशाहीला समर्थन देणारा दुसरा गट होता जेव्हा राज्यक्रांती होऊन जनता आपल्या हक्का साठी रस्त्यावर उतरली. फ्रेंच सम्राट सोळावा ल्युई यांनी फ्रेंच च्या संसद मध्ये राष्ट्रीय बैठक बोलविली होती. फ्रेंचच्या एक गृही सभागृह असलेल्या विधिमंडळात बोलविलेल्या बैठकीला राष्ट्रीय सभा म्हटले जात असे. त्यामध्ये राजेशाही सत्तेला समर्थन देणारा गट उजव्या बाजूला बसला होता. तर राजेशाही सत्तेला विरोध करणारा व ज्यांना राजेशाही सत्ता मान्य नसणारा क्रांतीकारी गट डाव्या बाजूला बसला होता. राष्ट्रीय सभेमुळे फ्रेंच मध्ये अनेक उलथापालथ होऊन फ्रेंच संविधान अस्तित्वात आले. मानवी हक्काचे संरक्षण करणारे कायदे सुध्दा करण्यात आले. अशा प्रकारे फ्रान्स मधील फ्रेंच राज्यक्रांती नंतर विधिमंडळातील आसन व्यवस्था नुसार राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनाचे डावी- उजव्या विचारसरणी मध्ये वर्गीकरण करण्यात सुरूवात झालेली आहे

आपल्या देशातील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचा विचार केल्यास आपल्या देशात अनादी काळापासून डावी-उजवी विचारसरणी कधीच अस्तित्वात नव्हती परंतू देश स्वतंत्र झाल्या नंतर आपल्या देशात सुद्धा कॉंग्रेस कडून धर्मनिरपेक्ष व सर्वधर्मसमभाव विचाराची मांडणी करत राजकीय पक्ष भारतीय जनसंघ आणि सामाजिक सांस्कृतिक संघटना असलेल्या राष्ट्रीय स्वंयसेवक संघ तथा हिंदू महासभेची सतत उजव्या संघटना म्हणून हेटाळणी केलेली आहे पण कॉंग्रेसने सर्व सामान्य माणसावर अन्याय करून सत्ता राबवितांना सतत अन्यायच केला गरिबांना गरीब केले नसबंदी पासून आणीबाणीचा अन्याय करून सुद्धा आपण डाव्या विचारसरणीचे असल्याचा टेंभा मिरविला आहे

# आध्यात्मिक वास्तुशास्त्र

(पान ८ वरून )

शेणाच्या सारवणाची वास्तुतील जमीन, वास्तुबाहेरील अंगण आपल्या पाहण्यात आहे. या सगळ्या नैसर्गिक वास्तुत ब्रम्हांडातील पंचतत्त्वांच्या ऊर्जेचा संतुलित सुमेळ साधणाऱ्या वस्तूंची जागा आता शिगा, सिमेंट या वास्तुतील पंचतत्त्वांची ऊर्जा संतुलित राखण्यास वेध, अडसर निर्माण करणाऱ्या कृत्रिम वस्तूंनी घेतली आहे. आपल्या त्रिकालज्ञानी ऋषीमुनींनी ब्रह्मांडातील पंचतत्त्वांची वास्तुशास्त्रामध्ये सुखद आणि शांतीमय सांगड आपल्या देहाशी घालून दिलेली आहे. सुख शांतीसाठी पूर्वीच्या काळी वास्तुशास्त्रानुसारच घरे बांधली जात होती इतकेच नव्हे तर वाडीची, गावाची, नगराची, मंदिरांची रचनाही वास्तुशास्त्रानुसारच केली जायची. श्रीकृष्णाच्या सांगण्यावरून वास्तुशास्त्री विश्वकर्मा निर्मित द्वारका नगरी, वास्तुशास्त्री मय निर्मित इंद्रप्रस्थातील कौरव-पांडवकालीन मायावी मयनगरी, विश्वकर्माचा पुत्र वास्तुशास्त्री नळ याच्या मार्गदर्शनाने रामाने बांधून घेतलेला सेतू, हडप्पा आणि मोहन्जोदाडो येथील नगर रचना इत्यादी व अशी अनेक उदाहरणे आहेत जी वास्तुशास्त्रानुसार बांधलेल्या बांधकामांची आहेत.

मानवाच्या शरीराचे व शरीरात चालणाऱ्या जैविक आणि रासायनिक क्रियांचे संरक्षण व्हावे, संतुलन राहावे यासाठी त्रिकालज्ञानी ऋषीमुनींनी महत्प्रयासाने वास्तुशास्त्राची निर्मिती केलेली आहे. त्याकाळी देवावर माणसाचा अतूट विश्वास होता. त्या विश्वासाच्या माध्यमातून ऋषीमुनींनी पौराणिक व आध्यात्मिक पाया संदर्भित ठेवून अनेक पुराणातून वास्तुशास्त्राचा उल्लेख उदाहरणादाखल पुढील प्रमाणे संदर्भित केलेला आहे.

स्कंद पुराण : नगररचना
अग्निपुराण : निवास वास्तू रचना
वायुपुराण : उंचावरील देवालये
गरुड पुराण : निवास वास्तु व देवालये
नारद पुराण : विहीरी, जलाशये व देवालये
मत्स्यपुराण : कोरीव काम, प्रसाद मंडप, स्तंभ इत्यादी.
मानसार : शिल्पकला, नगररचना, किल्ले, राजप्रासाद, धरणे इत्यादी.
विश्वकर्मप्रकाश : मूर्तिकला, निवास वास्तु, राजप्रासाद इत्यादी.
बृहत्संहिता : वृक्षारोपण, बाग-बगीचे, भूमी परीक्षण, प्रसाद इत्यादी.

(उर्वरित पुढील भागात)

# काव्यांगण

## माझे कोकण

माझे कोकण कोकण
आहे स्वर्गाहून छान
शब्द पडती अपुरे
त्याची वर्णाव्या शान ||१||

लाल मातीत उगवे
भात नाचणी वरई
काळ्या कातळाचे पाणी
किती वर्णू चव बाई ||२||

आम्हां रक्षितो सह्याद्री
पोट असे दर्यावरी
काजू बोरे करवंदे
रानफुले नानापरी ||३||

माड पोफळीची झाडे
जणू भिडती आकाशी
वा-यासंगे डोलणारे
दृश्य मोहवी मनाशी ||४||

साधीभोळी माणसे ती
जपतात नातीगोती
नाना कला त्यांच्या अंगी
जशी संस्कृती जपती ||५||

असे लाभलेला आम्हां
शूर वीरांचा वारसा
आम्ही कोकणी कोकणी
जीवापाड जपू वसा ||६||

**सौ. मानसी सावंत,**
**दापोली**

## खरं कोकण

कोकण म्हणजे हिरवीगार झाडी
कौलारु टुमदार घराघरांची वाडी
पायरीवर कळशी,त्याच्या वर लोटा
पडवीत झोपाळा,बाजूला गाईचा गोठा

कोकण म्हणजे काजू ,फणस ,आंबे
करंदा, जांभळा,चिंचा, बोरे,रतांबे
कोकण म्हणजे दर्याची गाज, नारळाची रास
मोगरा,आबोली,जाई-जुई, चाफ्याचा वास

कोकण म्हणजे तारली, बांगडा,पेडवे मासे
झापा,कौले,नळे आणि माडाचे वासे
जत्रा,दहीकाले,संकसुर,खाजा, भजी
भाकरी घावणे उसळ,भाजलले काजी

उकड्याची पेज,कुळदाची पिठी,सोलकढी
कोकण म्हणजे बैलाची गाडी,तरीची होडी
नवस फेडणारी नवी जोडी,माहेरची साडी
शहाळ्याचा पाणी,हौसेनं ताडी कधी माडी

कोकण म्हणजे सारं, खळाळत वारं सांगायचं तर खरं
खरंच राव - -तुमचं बर--तर मग आमचंय बर

**रुजारिओ पिंटो,**
**मालवण**



## कोंकण"- स्वर्गीय डेस्टिनेशन

स्वर्गाहुनी सुंदर
आहे माझे कोंकण....!
इथल्या लाल मातीच्या
कणाकणांत लपलयं सोनं..!

इथं कोंकणात माझ्या
नारळी पोफळीच्या बागा..!
सागर किनारी वाऱ्यावरी
डोलतात कशा छान बघा..!

बोरी करवंदीच्या जाळ्या
करी साऱ्या डोंगरावरी राज..!
स्वाद आंब्या फणसाचा
करी तुमच्या जिभेवर राज..!

माझ्या कोंकणातली माणसं
आहेत साधी भोळी..!
त्यांच्या काळजात भरलीया
गोड गोड शहाळी....!

कोंकणच्या किनारी
निळ्या निळ्या सागरांत...!
खोल खोल पाण्यांत
लपलिया चंदेरी दौलत...!

धावपळीच्या जगांत या,
कोंकण एक आहे
स्वर्गीय डेस्टिनेशन...!
जिथं मिळे तुम्हा,
सुख,शांती अन् समाधान..!

**प्रा. के. एस. शिरबंदे,**
**दापोली**

## आमचा कोकण

हिरव्या हिरव्या मळ्यात
नारळीच्या बागात
बारीक बारीक घरांत
मजा आमच्या कोकणात

ल्हान आमची घरा
वाड्यात आमच्या ढोरां
खळ्यात खेळतत पोरां
हय सगळाच आमचा बरा

सकाळी सकाळी उठाचा
न्हयवर फिराक जावचा
त्वांड पन थयच धुवचा
न्हावन धुवन घराक येवचा

कोरे चायचा पानी पिवचा
बिस्कीट बुडवन खावचा
अर्धा कुत्र्या मांजराक घालूचा
आनी पेजयेचा पानी जेवचा

तितक्यात निसतेकारणींन येवचा
वायच करमाट कढयेक घेवचा
मस्त टिकला त्येचा करूचा
उकड्या भाता बरोबर जेवचा

वापलेत खूप खूप राबाचा
पोरसु मात्र मस्त करूचा
कराड काढून टाकुचा
आनी अवान बरा लावचा

उंच नारळीर चढाचा
आडसार फोडून खावचा
चुडात घराक घेवन येवचा
बसान कढाण मस्त वळूचा

मर मर शेतात मराचा
न्हीमरात ढिपळा फोडीत रवाचा
रातभर माळ्यार जागाचा
इल्या सावदाक पळवन देवचा

वाडीच्या बाजाराक कधी जावचा
पावना वळखीचा कोण मेळाचा
हाटेलात बसान खावचा
पोरांका चिरमुले घेवन येवचा

आमो फणस पिकाचो
देवाक पयलो ठेवचो
सगळ्यांनी मेळानं खावचो
शेजारपाजाराक पण देवचो

चाकरमन्यानी येवचा
मुमयचा खावक हाडुचा
वायच आसला तरी खावचा
मिठी मारून भेटाचा

असा आमचा कोकण आनी
कोकण आमचो गाव
आसात ता मेळानं सगळीजाणा खाव
तुमी पन येया बघुक
आमचो हो असलो गाव
आठवणीत मातर ठेया
कोकण आमच्या गावाचा नाव....

**महेश आडेलकर,**
**सावंतवाडी**

## माझां कोकण

घाटातसून जाता माज्या कोकणातली वाट
दाराफुडे व्हवतत माज्या
पानयाच्ये पाट
कॅलिफोर्नियाक कशाक जाता
हयचं माजा श्यात
आंबे आनी काजी खाव्नं
फुटात तुमचा प्यॉट
होळयेक आमच्या नाव ठेवची
हिंम्मत कोनची काय
शबय मागान, रोंबाट घालूची
मजा खयचं यवची नाय
झाडा वरचे आंबे कॅव्हा
धोंड्यान पाडूचे न्हयं
सांगान सांगान थकली आव्सं
पन..आमी आय्कतू खयं..
पयल्या पावसाकं खवळे धरूची
मजा परत यवची नाय
सांचो घराक इल्यार काय
मार काय चुकाचो नाय..
श्रावणातल्या सणांची..
आनि हिरव्या निसर्गाची
मनात दडलेल्या आनंदाची
सर खयचं यवची नाय..
गणपतीतल्या आरतींची
आनि रात्रींच्या भजनांची
जगात खयवं गेलू तरी
गोडी काय यवची नाय...
गोडी काय यवची नाय...

**जयेश अ.माधव**



## फरक शोधा



## निसर्ग माझा मित्र!




कु. वेदिका सुभाष मलूख.
इयत्ता- आठवी

निसर्गही देवाकडून मिळालेली अनमोल आणि मौल्यवान देणगी आहे. निसर्ग आपल्याला सर्व माणसांना भरपूर काही देतो पण त्या बदल्यात मनुष्याला काहीही मागत नाही. आपला निसर्ग बऱ्याच नैसर्गिक सौंदर्याने नटलेला आहे. ज्याचा आपण कधीही आनंद घेऊ शकतो.

निसर्ग आपला खरा मित्र आहे. हीच ती शक्य आहे जी पृथ्वीवर सर्व काही देते. आपल्याला अन्न, वस्त्र, निवारा या गरजा पूर्ण करते. निसर्गाने आपल्याला प्राणवायू दिला आहे, प्राणवायू आपल्या संपूर्ण जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे. सकाळचे शुद्ध नैसर्गिक हवा आपल्याला निरोगी आणि मजबूत बनवते. बागेतील सर्व झाडांची हिरवळ पाहून मानसिक ताण-तणाव कमी होतो. शरद ऋतूत होणारे पान म्हणजे झाडाचा शेवट नाही, वसंता त्याला पुन्हा नवीन पालवी फुटते. त्याप्रमाणे माणसाने कधी अपयशाला घाबरू नये.

पुन्हा नव्याने प्रयत्न करावेत. निसर्ग हा फक्त मनुष्याचे मित्र नसून तो पशुपक्षी, कीटकांचाही मित्र आहे.



निसर्गातील वाढत्या नद्यांचा आवाज, झाडांची सावली, फळे, घरटे, पक्षांच्या मधुर आवाज, शुद्ध हवा, निरभ्र आकाश, चंद्र, सूर्य, डोंगर, दर्या, धबधबे, पावसाच्या सरी, शेतातील पिके हा सर्व निसर्ग पाहून माणसाचे मन प्रसन्न होते.

प्रदूषणामुळे निसर्गाचा ऱ्हास आहे. आपल्या सर्वांना निसर्ग जपण्याची खरोखरच गरज आहे. निसर्गाने आपल्याला खूप काही दिलं आहे. आपणही संकल्प करायला हवा सर्वांनी एकत्र येऊन निसर्गाला संरक्षित करूया.

**निसर्ग हाच आपला खरा मित्र आहे.**



## निसर्गाला जाणूया



**कु. पूर्वा सचिन जगदाळे,
इयत्ता-आठवी**



निसर्ग ही देवाकडून मिळालेली अनमोल आणि मौल्यवान भेट आहे. निसर्ग मानवाला बरच काही देतं पण त्या बदल्यात मनुष्याकडे काहीच मागत नाही. आपला निसर्ग बऱ्याच साऱ्या नैसर्गिक सौंदर्याने नटलेला, सजलेला आहे. ज्याचा आपण कधी सुद्धा आनंद घेऊ शकतो.फक्त आपल्याच पृथ्वी या ग्रहावर सजीव सृष्टी आहे. निसर्ग म्हणजे सृष्टी, ही सृष्टी पृथ्वी, आकाश,अग्नी वायू,पाणी या पाच तत्त्वांनी बनलेली आहे. या निसर्गाचे आणि मनुष्याचे नाते हे जन्मापासूनचे आहे. निसर्गाच्या या पाच तत्वांनी मनुष्याचा जन्म झाला.आहे या निसर्गातच माणसाचा जन्म होतो तो या निसर्गातच वाढतो आणि विलीन होतो.

माणसाच्या पाच मूलभूत गरजा असतात त्या म्हणजे अन्न,पाणी,हवा,वस्त्र आणि निवारा. माणसाच्या या मूलभूत गरजा फक्त निसर्गच पुरवतो. निसर्ग जर आपल्याला वाढवतो तर आपण सुद्धा या निसर्गाला वाढवलं पाहिजे. म्हणजे की आपण या निसर्गाची काळजी घेतली पाहिजे. आपण निसर्गाला अजून खूप सुंदर नटवल,सजवलं पाहिजे. आपण खूप सारी झाडे लावले पाहिजे त्यांना वाढवले पाहिजे मग तीच झाडे मोठी होऊन आपल्याला मदत करतात. आपल्याला उन्हाळ्यात सावली देतात, महत्त्वाचं तर झाडांमुळेच खरंतर आपण आता जिवंत आहोत. झाडेच आपल्याला ऑक्सिजन देतात, पाऊस पण झाडांमुळेच पडतो.मग जर झाडेच नसती तर, निसर्गाला काहीच अर्थ नसता. निसर्गामध्ये अनेक गोष्टी असतात. ज्यांच्यामुळे निसर्ग सजतो.

नदीमुळे सुद्धा निसर्ग सजतो,नटतो.नदी आपल्याला पाणी देते आणि जर आपणच नदीला स्वच्छ ठेवलं नाही तर आपल्याला पाणी कसे मिळणार?निसर्ग सुंदर कसा दिसणार?आपण नदी स्वच्छ ठेवली पाहिजे. नदीच्या शेजारचा परिसर स्वच्छ ठेवाला पाहिजे.अशाच निसर्गाच्या बऱ्याच काही गोष्टी आहेत ज्या आपण स्वच्छ ठेवल्या पाहिजेत. निसर्गचचे महत्व जाणून घेतलं पाहिजे.

# क्षितिज' तर्फे चंद्रनगर शाळेत बक्षीस वितरण

**दापोली-** दापोली येथील 'क्षितिज कला मंच' ने तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या रानबिया संकलन स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ नुकताच दापोली तालुक्यातील जिल्हा परिषद चंद्रनगर मराठी शाळेत पार पडला. या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलसचिव प्रमोद सावंत, जालगांवचे सरपंच तथा बांधकाम व्यावसायिक अक्षय फाटक, उद्योजक अमोल मुंगशे, जिल्हा नियोजन समिती सदस्य मोहन मुळे, चंद्रनगरच्या सरपंच भाग्यश्री जगदाळे, चंद्रनगर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रुपेश बैकर, दापोलीतील प्रथितयश कवी व गझलकार सुदेश मालवणकर, चंद्रनगर शाळेचे मुख्याध्यापक मनोज वेदक आदी मान्यवर उपस्थित होते.

चंद्रनगर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग करून व पर्यावरण संतुलनाचे भान ठेवून जंगली वृक्षांच्या हजारो रानबिया संकलीत केल्या. चंद्रनगर शाळेतील



विद्यार्थ्यांकडून अऔइशय भरघोस प्रतिसाद लाभल्याने हा बक्षीस वितरण समारंभ चंद्रनगर शाळेत आयोजित करण्यात आला होता. या अभिनव स्पर्धेत सर्वाधिक रानबिया गोळा करून व त्यांची गटवार विगतवारी करून लक्षणीय कामगिरी केल्याबद्दल चंद्रनगर शाळेतील कु. आरोही महेश मुलूख हिचा प्रथम क्रमांकाचे बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. कु. श्रेयश अनिल शिगवण याने द्वितिय तर कु. स्वरा श्रीकांत कोळंबे हिने तृतिय क्रमांक पटकावला. व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते विजेत्या व शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना आकर्षक भेटवस्तू व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. यावेळी अक्षय फाटक, प्रमोद सावंत, सुदेश मालवणकर, मोहन मुळे आदींनी आपले पर्यावरणविषयक विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबू घाडीगांवकर यांनी केले तर क्षितिज कला मंचच्या सुनील कदम यांनी सर्वांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी क्षितिज कला मंचच्या सर्व सदस्यांनी अपार मेहनत घेतली.





# बालजगत








## आमची पावसाळी सहल.



कु. स्वामिनी वसंत पवार
इ. 10 वी,
डॉ. शिरोडकर हायस्कूल परळ,
मुंबई.



**पावसाळ्यातील एक दिवस..**

'येरे येरे पावसा' असे गाणे आठवले की आनंद गगनात मावेना! जून महिना संपत आला तरी पावसाचा एकही ढग आकाशात दिसत नव्हता. सर्व सजीव सृष्टीला पाऊस पडण्याची आतुरता लागली आणि सर्व सजीव सृष्टी आनंदाने भरून केले मखमली गवताची चादरच पसरणार होती पण पावसाचा ठावठिकाणा नव्हता.वातावरणात मायेची शीतलता घेऊन येणारा तो

**'नेहमीची येतो**
**मग पावसाळा'**

म्हणजे पावसाळा ऋतू कोणाला नाही आवडत?? मला तर पावसाळ्यामध्ये खूप मजा येते आमच्या घरचा एक नियम आहे पावसाळा ऋतू आला की आम्ही कुटुंबीय दर वर्षी न चुकता पावसाळी सहलीला जातो सहल म्हणजे जणू आनंदाचा पूरच!! सहल शब्द ऐकताच मला खूप आनंद होतो माझ्या अंगात एक आवेशच संचारतो... जणू आमच्या कुटुंबाचा पावसाळी महोत्सवच! पावसात पावसाळी सहल म्हणजे वेगळाच अनुभव असतो आम्ही सर्व कुटुंबीय एकत्र येऊन पावसात भिजतो, नाचतो, गातो. पावसाचा मनमुराद घेत आनंदमय दिवस साजरा . सहलीला जाण्याचा दिवस उजाडला अगदी सकाळी सकाळीच खंडाळ्याच्या घाटाच्या दिशेने आमची गाडी चालली होती आम्ही खंडाळ्याच्या दिशेने मार्गस्थ करतो. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आम्ही निसर्गरम्य ठिकाणी म्हणजे खंडाळाचा घाट या ठिकाणी जायचे ठरवले होते झालो प्रत्यक्ष घाटात गाडी आल्यावर थोड्या वेळासाठी आमच्या पोटात गोळाच आला... नंतर बाहेर बघताना काय ते सुंदर नयनरम्य दृश्य!! चारी बाजूंनी डोंगर माथ्यावर काळे ढग वर वर जाताना दिसत होते.

मला तर वाटत होते की आपणही ढगांसोबत मऊ ढगांसोबत डोंगर माथ्यावर जावे. थोड्या वेळात पावसाची रिमझिम सुरू झाली आम्ही गाडीतूनच हे दृश्य भान हरपून पाहत होतो आम्ही राजमाची वर पोहोचलो. तोपर्यंत पावसाने विश्रांतीचे संकेत दाखवतात नंतर काय ते सुंदर निसर्ग रम्य दृश्य होता डोंगरावरून वाहणारे पाण्याचे धबधबे दिसू लागली आणि मंजूर गाणी म्हणत झरे ओसंडून वाहत होते. तेवढ्यात सृष्टीचा ऊन पावसाचा अनोखा खेळ सुरू झाला पाणी सूर्याच्या किरणांमुळे चमकत होते. हिरवी शाल पांघरलेले डोंगरमाथे द-या पाहताना तर डोळ्यांचे पारणे फेडण्यासारखे दृश्य होते. आम्हाला खंडाळ्याला येऊन तास झाला होता पण सर्वजण पावसाळी हवेचा आनंद लुटत होतो.

**बेधुंद पावसाच्या सरींचृया वर्षा वर आत आम्ही मनमुरादपणे बागडत होतो.**

## निसर्ग माझा सोबती



कु. अथर्व सुनील रांगले,
इयत्ता- सातवी.



आम्ही फिरायला निघालो होतो. आमची गाडी परशुराम घाटातून चालली होती. आई बाबा गप्पा मारत होते. पण तेवढ्यात बाबा मला म्हणाले, "अथर्व, तू निसर्ग चित्र काढतोस मग मला सांग की या ज्या निसर्गाच्या हिरव्या रंगाच्या छटा दिसत आहेत त्या तू कागदावर उतरवून काढू शकशील ?" मी म्हणालो, "बाबा, कसं शक्य आहे? मला नाही येणार." मग माझ्या लक्षात आलं की, हीच तर आहे निसर्गाची कमाल !

आपण रोजच्या रोज कितीतरी वस्तूंचा वापर करतो. रोज आपण जेवतो, पाणी पितो. रोज आपण निरनिराळ्या भाज्या, वेगवेगळी फळं, तऱ्हेतऱ्हेची फुलं पाहतो. त्यांचा वापरही करतो. हे सगळं आपल्याला निसर्गच देतो. निसर्गातूनच मिळणारी औषधं आपण वापरतो. इतकाच काय ? आपण जे कपडे घालतो तेही निसर्गातल्या झाडांपासून मिळतात. झाडांपासून आपल्याला कितीतरी गोष्टी मिळतात. जसे- ताग, रबर, कापूस, कागद, मध, लाकूड, अन्नधान्य पाणी, शुद्ध हवा ह्या ही गोष्टी मिळतात त्या निसर्गातूनच.

आज माणसाचं अवघं जीवन निसर्गाच्या चांगुलपणावर अवलंबून आहे. असा दानवीर निसर्ग आपला मित्र, दोस्त, सखा नव्हे नव्हे प्राण सखा आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' हे संतवचन आपण दुर्दैवाने विसरत चाललो आहोत आणि म्हणूनच आपण निसर्गापासून दूर चाललो आहोत. पर्यायाने आपले पाऊल विनाशाकडे पडत आहे. आजकाल बेदरकार वृक्षतोड करून माणूस सिमेंटची जंगले उभारत आहे. पैशाच्या हव्यासाने तो खनिज संपत्तीचा बेसुमार वापर करत आहे. वायुदूषित करणारे कारखाने, मुंग्यांसारखी वाहणारी वाहने यामुळे हवेतील प्रदूषण वाढत आहे. तीच गोष्ट पाण्याची. कारखान्यातील सांडपाणी आणि वाढत्या गटारगंगेमुळे जमिनीतील जलसाठा ही दूषित होऊ लागला आहे. निसर्गातील या प्रदूषणामुळे हवामानाचा तोल बिघडत चालला आहे. यामुळेच दुष्काळ व अतिवृष्टीची संकटे वारंवार येऊ लागली आहेत. कॉलरा, अमांश, डेंग्यू यांसारखे जीवघेणे रोग निसर्गाच्या कोपामुळे नव्हे तर माणसांच्या बेफिकिरीमुळे निर्माण होत आहेत.

बघितलंत, प्राणसखा वाटणारा हा निसर्ग जर कोपला तर तो आपल्यावर किती प्रचंड आघात करू शकतो ते? या 'अस्मानी सुलतानीपासून' स्वतःला वाचवायचं असेल आणि आपलं जीवन सुखकारक व सुरक्षित ठेवायचं असेल तर निसर्गाशी दोस्ती केली पाहिजे .वातावरणाचे प्रदूषण करणाऱ्या प्लास्टिक, थर्माकोल तसेच पेट्रोल, डिझेल, रॉकेल या इंधनांचा वापर कमी करून ओझोनच्या थराचे रक्षण करण्याचे मनापासून ठरवूया व निसर्गाला, आपल्या मित्राला अबाधित ठेवण्याचे वचन देऊ या!

## निसर्ग जपायला हवा!



कु. स्वानंदी मोहीत,
कोंगळे, ता. दापोली.

आपल्या सर्वांना माहीतच आहे की पूर्वीच्या काळापासूनच मनुष्य आणी निसर्ग यांच्यामधील नात हे अत्यंत मौल्यवान तसेच इतर नात्यांपेक्षा वेगळं आहे. कारण पूर्वीपासूनच सजिवसृष्टी ही निसर्गातील विविध घटकांवर अवलंबून आहे. पृथ्वीवरील प्रत्येक घटक हा निसर्गाच्या कुशीत जन्म घेतो आणी निसर्गाच्याच कुशीत अंतिम श्वास देखील घेतो. मनुष्य पूर्वीपासूनच आपल्या जीवनातील मूलभूत गरजा या निसर्गाद्वारे भागवत असतो. म्हणून निसर्ग हा मानावाच्या जीवनातील एक अविभाज्य घटक आहे. परंतु आज आपण पाहिलं तर विज्ञानाने मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे.

मनुष्य हा आधुनिक तंत्रज्ञान आणी विज्ञान यांच्या मदतीने हळूहळू अनेक क्षेत्रात प्रगती करू लागला आहे तसेच माणसाच्या प्रगतीचा वेग हा दिवसांदिवस वाढत चालला आहे आणि कदाचित यांमुळेच देखील कुठेतरी मानवाच्या गरजाचा विस्तार वाढत चालला आहे.याचं गरजा पूर्ण करण्यासाठी आज तो निसर्गाच्या जीवावर उठला आहे. निसर्गाचा अतिवापर केल्याने आज निसर्गाची परिस्थिती बिघडत चालली आहे. आजची परिस्थिती पाहता निसर्गातील घटकांवर परिणाम करणारे घटक वाढत चालले आहेत माग त्या मध्ये कोणत्याही प्रकारच प्रदूषण असो जंगलतोड, वाढते तापमान,किंवा वनस्पती नष्ट होने इत्यादी. एकंदरीत काय तर सतत निसर्गातील साधनसंपतीचा अतिवापर केल्याने निसर्गाचा समातोल बिघडत चालला आहे आणि ही गोष्ट .

मानावाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बनली आहे कारण एकंदरीत या सर्वांचा परिणाम आताच्या काळात दिवसेंदिवस घडत असलेल्या घटनांमधून दिसत आहे. निसर्ग हा कोणत्या ना कोणत्या कृतीतून मानवाला सावध करण्याचा प्रयत्न करत आहे. कारण निसर्ग हा बाहेरून जरी सुंदर असला तरी तो खूप घातक देखील आहे. वाढत्या शहरीकरणामुळे आणि उद्योग धंद्यामुले मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड होत आहे त्यामुळं आज वृक्ष लागवडी एवजी वृक्ष तोड जास्त दिसून येत आहे. त्याचबरोबर वाढते तपमान, अचानक जंगलाला लागत असलेली आग यामुळे अनेक मोठ्या प्रमाणात वनस्पती चा नाश होत आहे. अनेक जीव हळूहळू नष्ट होत चालली आहेत. परंतु असे म्हणतात की जो पर्यत स्वतः कोणत्या गोष्टीचा अनुभव घेत नाही तोपर्यंत आपण त्या गोष्टीला महत्व देत नाही परंतु ती त्या गोष्टीचा अनुभव निसर्गाला करून द्यायला किंचितही वेळ लागणार नाही. त्यामुळे या विषयी जागरूक होऊन आपल्याला निसर्गाचे संवर्धन करणे गरजेचे झाले आहे. त्याचप्रकारे निसर्ग संवर्धनासाठी वेगळा उपाय योजना फक्त आंमलात आणून नाही तर त्यांची अंमबलबजावणी करण्यात यावी. कारण पृथ्वी आणी निसर्ग हा सर्वांचाच आहे त्यामुळे त्याच संगोपन करत ही आपली जबाबदारी आहे आणि हे प्रत्येकाने समाजाने गरजेचे आहे. कारण आजचा जगाचा विचार करता विकास आणि निसर्ग यामध्ये समातोल राखणे गरजेचे आहे. कारण जेवढा विकास गरजेचा आहे तेवढाच निसर्ग ही आहे. परंतु जर फक्त प्रगतीच्या वाटेवर चालत राहिलो तर निसर्गाचे कोपणे मानवला कळायला वेळ लागणार नाही. एकंदरीत काय तर तुम्ही जेवढं निसर्गाशी खेळालं तेवढाच तो देखील खेळेल आणि जेव्हा तो खेळ खेळायला सुरु करेल त्यावेळी मात्र मनुष्यच जीवन जगणंच अशक्य होऊन बसेल.